www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ 'स्पर्धा परीक्षांना सकारात्मकतेने सामोरे जा,....

पान ३ वर....

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ हरित क्रांतीतील स्वामिनाथन यांच्याप्रमाणेच जैवइंधन क्रांतीत...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १७८ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार,२८ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## 'माझ्या शरीरात रक्ताचा थेंब असेपर्यंत मी काम करेन.' - एकनाथ शिंदे

### काळजीवाहू मुख्यमंत्री शिंदेनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली

● ठाणे, यश सावंत :

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत महायुतीने एकतर्फी विजय मिळवला. या निवडणुका झाल्यानंतर एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. दरम्यान काळजीवाहू मुख्यमंत्री यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी आपली भूमिका मांडली आहे.गेली अडीच वर्ष एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून राज्याचा कारभार पाहिला. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले आहेत. यासह, आम्ही रडणारे नाही, तर लढणारे आहोत.असं



म्हटलंय.

पत्रकार परिषदेत बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, 'आम्ही नाराज होऊन रडणारे नाहीत. आम्ही लढून काम करणारे आहोत. हे सरकार लोकांमध्ये जाणारे सरकार आहे. आम्ही मनापासून काम केलं.

माझ्या शरीरात रक्ताचा थेंब असेपर्यंत मी काम करेन.' 'अडीच वर्षांच्या काळात राज्याच्या प्रगतीचा वेग वाढला आहे, त्याचं कारण समविचारी सरकार आहे. राज्यात आणि केंद्रात त्यावेळी प्रगतीचा वेग अतिशय गतिमान होतो. हे सगळं अडीच वर्षांच्या कारकीर्दीत घडलं, मी खूप समाधानी आहे.

मी काय डिटेल्समध्ये जाणार नाही. या काळात आम्ही ऐतिहासिक निर्णय घेतले. गेल्या अडीच वर्षात महायुती सरकारने जे काही निर्णय घेतले, ते यापूर्वी कुठल्याही सरकारने घेतले नव्हते.' असं एकनाथ शिंदे म्हणाले.

तसेच ते पुढे म्हणाले, 'आपण जे काही पाहतोय की, राज्याच्या प्रगतीचा वेग प्रचंड वाढला. राज्य एक नंबरला नेण्याचे काम आम्ही केले आहे. महायुतीचं सरकार होतं तेव्हाही पुढे होतं. मागच्या अडीच वर्षांतही पुन्हा पहिल्या नंबरला राज्य आणलं. या राज्यात जे अडीच वर्षांत काम केलं त्यामुळे या निवडणुकीत मतांचा वर्षाव झाला. लाडकी बहीणीचा सख्खा लाडका भाऊ अशी ओळख निर्माण झाली. सावत्र भावांना लक्षात ठेवा असं सांगितलं होतं आणि पूर्णपणे त्यांनी लक्षात ठेवलं. लाडका भाऊ ही ओळख सर्व पदांपेक्षा मोठी वाटते. त्यामुळे मी आपल्याला एवढंच सांगेन की,मी समाधानी आहे.

पान २ वर

## रुग्णवाहिका व्यवस्थेच्या हलगर्जीपणामुळे पालघर जिल्ह्यातील गरोदर मातेसह बाळाचा मृत्यू

● पालघर, सुचिता देशमुख :





पालघर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेतील रुग्णवाहिका व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभारामुळे एका गरोदर महिलेसह तिच्या बाळाला आपला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही मृत गरोदर महिला डहाणू तालुक्यातील सारणी या गावातील असून पिंकी डोंगरकर (रा. सारणी, तालुका डहाणू) असे तिचे नाव आहे. रुग्णवाहिका उशिरा मिळाल्यानंतर वलसाड येथे उपचारासाठी नेत असताना अर्ध्या रस्त्यात तिच्यासह तिच्या पोटातील बाळाचा मृत्यू झाल्याची ही दुःखद घटना घडली.

या विषयी अधिक माहिती अशी की, प्रसूती वेदना जाणवू लागल्यावर पिंकी यांना तातडीने उपचारासाठी कासा उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मंगळवारी प्रसूतीसाठी कासा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करताच तिची परिस्थिती चिंताजनक बनली. मात्र, तिची प्रकृती गंभीर होत असल्याने तिला गुजरातच्या वलसाड येथील रुग्णालयात हलवण्याचा सल्ला कासा रुग्णालयातील डॉक्टरांनी दिला. यावेळी १०८ क्रमांकाच्या आपत्कालीन रुग्णवाहिकेची मदत घेण्याचा प्रयत्न केला गेला.

पान २ वर

## माहिती नाकारल्याने राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाने विरारच्या निवृत्त तलाठ्याला सुनावला २५ हजारांचा दंड




● विरार, सतीश सोनावणे :

माहिती अधिकारात मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ केल्याप्रकरणी विरारच्या निवृत्त तलाठ्याला २५ हजारांचा दंड सुनावण्यात आला आहे. राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाने हा आदेश दिला. तक्रारदाराला पुढील १५ दिवसात निशुल्क माहिती पुरविण्याचे निर्देशही खंडपीठाने दिले आहेत.

टेरेन्स हॅन्ड्रीक्स हे माहिती अधिकार कार्यकर्ते आहेत. हॅन्ड्रीक्स यांनी १६ एप्रिल २०२१ रोजी विरारचे तत्कालीन तलाठी चंद्रकात साळवे यांच्याकडे फेरफार संदर्भात माहिती मागितली होती. मात्र त्यांना माहिती देण्यात आली नाही. यामुळे हॅन्ड्रीक्स यांनी प्रथम अपील दाखल केले होते. तरी देखील त्यांना कोणतीही माहिती देण्यात आली नाही. यामुळे हॅन्ड्रीक्स यांनी द्वितीय अपील दाखल केले. या अपिलावर राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाने नुकतीच सुनावणी घेतली.

तलाठी चंद्रकांत सावळे यांनी माहिती देण्यास विलंब केला तसेच सुनावणीदरम्यान त्यांनी दिलेले स्पष्टीकरण असमाधानकारक ठरले.

पान २ वर

## राज्यातील 'या' विधानसभा मतदारसंघात होणार फेर मतमोजणी

● नाशिक, सचिन कदम :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान पार पडले व २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर झाला. या निकालात महायुतीची प्रचंड मोठी सुनामी आल्याचे पाहायला मिळाले. महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला व त्यांना ५० चा आकडाही गाठता आला नाही. त्यानंतर ईव्हीएमवर संशयाचे मोहोळ उठले आहे. विरोधकांनी ईव्हीएमविरोधात आवाज उठवण्यासाठी विरोधकांकडून पुन्हा वज्रमूठ करण्यात आली आहे. तसेच काही ठिकाणी फेर मतमोजणीची मागणी करण्यात आली आहे. नाशिक




पश्चिम मतदार संघात पुन्हा फेर मतमोजणी करण्याची मागणी शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार सुधाकर बडगुजर यांनी केली होती. त्यांची मागणी निवडणूक आयोगाने मान्य केली आहे. त्यासंदर्भातील पत्र नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्याने सुधाकर बडगुजर यांना दिले आहे.

नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक मतदारसंख्या असणाऱ्या नाशिक पश्चिम मतदारसंघात भाजपच्या उमेदवार सीमा हिरे विजयी झाल्या आहेत. त्यांना १ लाख ४१ हजार ७२५ मते मिळाली असून शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांचा हिरे यांनी ६८ हजार १७७ मतांनी पराभव करत हॅटट्रिक साधली. बडगुजरांना ७३ हजार ५४८ मते मिळाली आहेत. मनसेचे दिनकर पाटील यांना ४६ हजार ६४९ मते मिळून ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले. या निकालानंतर राज्यातील अनेक ठिकाणी ईव्हीएम मशीनमध्ये फेरफार केल्याचा तसेच हॅक केल्याचा आरोप करत फेर मतमोजणीची मागणी केली जाऊ लागली आहे. अनेक मतदारसंघामध्ये मृत व्यक्तींच्या नावाने देखील मतदान झाल्याचा दावा परळीसह अनेक मतदारसंघामध्ये करण्यात आला आहे. नाशिक पश्चिम मतदारसंघातील शिवसेना ठाकरे गटाचे पराभूत उमेदवार सुधाकर बडगुजर यांनी फेर मतमोजणी मागणी केली होती. ती मागणी निवडणूक आयोगाने मान्य केली आहे.

बडगुजर यांनी निवडणूक आयोगाला यासाठी पत्र पाठवले होते. त्यांच्या मागणीनंतर एकूण असलेल्या बुथ पैकी ५ टक्के बुथवर फेर मतमोजणी होण्याची शक्यता आहे. फेर मतमोजणीसाठी एक बुथसाठी ४० हजार रुपये शुल्क आणि जीएसटी भरण्याचे पत्र नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुधाकर बडगुजर यांना दिले आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी वापरण्यात आलेली मतदान यंत्रे (ईव्हीएम) सील करून गोदामात ठेवण्यात आली आहेत. ही यंत्रे आता ४५ दिवस सील राहणार आहेत. एखाद्या उमेदवाराने निकालावर आक्षेप घेतल्यास न्यायालयीन प्रक्रियेसाठी ४५ दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे राज्यभरातील मतदान यंत्रे ४५ दिवसांपर्यंत सील राहणार आहे. मतदान यंत्रासह कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट मशीन सील करुन ठेवण्यात आली आहेत.

## मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर भारतात गेले २६ वर्षे राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकाला अटक

● मुंबई, राकेश गायकवाड :



मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका बांगलादेशी नागरिकाला अटक करण्यात आली आहे. ही व्यक्ती गेली २६ वर्षे बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून भारतात राहत होता. मिळालेल्या माहितीनुसार बनावट कागदपत्रांच्या आधारे गेल्या २६ वर्षांपासून भारतात वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकाला मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर नियमित सुरक्षा तपासणीदरम्यान पकडण्यात आले. पोलिसांनी मंगळवारीच माहिती दिली. इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी आरोपीला फ्लाइटमध्ये चढण्यापासून रोखण्यात आले. अधिकारींनी सांगितले की, पासपोर्टच्या तपशिलात तफावत आढळून आली, त्यानंतर त्याला संशयावरून थांबवण्यात आले.

पान २ वर

## पुणे पोलिसांचा लाडका मित्र लियो कालवश; शासकीय इतमामात झाले अंत्यसंस्कार

● पुणे, अभिजित येरल्लू :

पुणे पोलीसांचा लाडका लियोचा आजारपणामुळे मृत्यू झाला आहे. लियोने पोलीसांसोबत मिळून अनेक गुन्ह्यांचा छडा लावला. त्याने कोट्यवधी अंमली पदार्थाअसोबतच शस्त्रसाठा व चोरांचा माग काढला आहे. या लाडक्या लिओच्या पार्थिवावर शासकीय इतमात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्याला निरोप देतांना पोलिस अधिकाऱ्यांना देखील अश्रु अनावर झाले होते.

श्वान लिओ हा लॅब्राडोर जातीचा श्वान होता. त्याचा जन्म २० जुलै २०१६ रोजी झाला होता. लिओने २० सप्टेंबर २०१६ रोजी पुणे पोलीस दलात दाखल



होत त्याच्या सेवेला सुरुवात केली होती. लिओचा अंमली पदार्थ शोधण्यात हातखंड होता. त्याला यासाठी खास प्रशिक्षण देण्यात आले होते. 'लिओ'ने २८ डिसेंबर २०१९ रोजी कोंढवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका इमारतीमध्ये पोलिसांसोबत महत्वाची कामगिरी करत एका नायजेरीयन व्यक्तीकडून व ५० किलो गांजा पकडून देण्यात महत्वाची भूमिका बजावली होती. तसेच, ३१ ऑगस्ट २०२२ रोजी लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका शेतामधून ७० किलो गांजा पकडून दिला होता. या सोबतच २०१९ मध्ये कोंढवा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका नायजेरियन नागरिकाकडून अंमली पदार्थ आणि ५० किलो गांजा जप्त करण्यात लिओने महत्त्वाची भूमिका होती. या सोबतच पुणे रेल्वे स्थानक, बसस्थानक, येरवडा कारागृहात नियमितपणे अंमली पदार्थांची तपासणी करण्यासाठी 'लिओ'कार्यरत होता. लिओच्या घ्राणेंद्रिय इतर श्वानांपेक्षा तीक्ष्ण असल्याने त्याचा फायदा पोलिसांना मोठा फायदा झाला. लिओने भारतीय लष्कराच्या जवानांकरिता डेमो प्रात्यक्षिके तसेच विविध शाळांमध्ये प्रात्यक्षिके देखील सादर केले.

पान २ वर

## नाशिकच्या खैर तस्करीचे धागेदोरे थेट चिपळूणपर्यंत; नाशिक वन विभागाने चौघांना केली अटक

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :



नाशिकच्या खैर तस्करी प्रकरणाचे धागेदोरे थेट चिपळूणपर्यंत पोहोचल्याने मंगळवारी नाशिकच्या वन विभागाने तालुक्यातील तीन कातभट्ट्यांवर छापा टाकला. यातील एका कंपनीतून तब्बल ८० लाखाचा अवैध मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या छाप्यात सावर्डेतील कातभट्टी फॅक्टरीला सील ठोकले असून, फॅक्टरींच्या मालकाला नोटीस बजावली आहे.

नाशिक मधून अन्य कोण कोणत्या फॅक्टरीमध्ये खैराची तस्करी झाली आहे, याचा नाशिक वनविभागाकडून शोध सुरू आहे. जिल्ह्यातील काही कात फॅक्टरी त्यांच्या रडारवर आहेत. याबाबत नाशिकचे विभागीय वन अधिकारी विशाल माळी यांनी माहिती देताना सांगितले की, खैर तस्करीप्रकरणी नाशिक वन विभागाने चौघांना अटक केली आहे.

पान २ वर

## मुंबईतील बैठकीत उद्धव ठाकरेंनी निवडणूक निकालाबाबत उमेदवारांना दिले निर्देश



● मुंबई, प्रथमेश चव्हाण :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर विरोधी आघाडी सातत्याने प्रश्न उपस्थित करत आहे आणि निकाल चुकीचा ठरवत आहे. या निकालांबाबत विरोधी आघाडीला ईव्हीएम मशीनमध्ये गडबड झाल्याचा संशय असून महाराष्ट्रात बॅलेट पेपरवर पुन्हा निवडणुका घेण्याची मागणी केली जात आहे. याच मालिकेत शिवसेनेचे यूबीटी नेते उद्धव ठाकरे यांनीही ईव्हीएममध्ये छेडछाड झाल्याचे म्हटले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार यानंतर उद्धव ठाकरेंनीही कार्यकर्त्यांना सूचना दिल्या आहे ज्या मतदान केंद्रांवर ईव्हीएममध्ये छेडछाड झाल्याचा संशय आहे, त्या मतदान केंद्रांवर ५ टक्के व्हीव्हीपीएटी पुन्हा मोजण्यासाठी याचिका दाखल करण्याचा निर्णय उद्धव ठाकरेंनी घेतला आहे. उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या सर्व पराभूत उमेदवारांना ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याचा संशय असलेल्या मतदान केंद्रांवर लवकरात लवकर ५ टक्के व्हीव्हीपीएटी पुन्हा मोजण्यासाठी याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले आहे.

निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार, पराभूत उमेदवार निवडणूक निकालानंतर ६ दिवसांच्या आत ५ टक्के VVPAT ची पुनर्गणना करण्याची मागणी करू शकतात. तत्पूर्वी उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी बैठक घेऊन पक्षाच्या खराब कामगिरीचा आढावा घेतला.

## "राजकीय अजेंड्यांनुसार न्यायालय चालेल अशी अपेक्षा करणं चुकीचे.."- माजी सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड


● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या पराभवानंतर शिवसेना नेते संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांवर माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी आरोप फेटाळून लावले आहेत. चंद्रचूड यांनी आमदारांना अपात्र ठरविण्याच्या प्रकरणांवर योग्य व वेळेत निर्णय घेतला नाही, ज्यामुळे महाविकास आघाडी सरकार कोसळलं, असा आरोप राऊत यांनी केला होता.

एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत माजी सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले की, आमच्या कार्यकाळात सर्वोच्च न्यायालयात अनेक महत्त्वाची घटनात्मक प्रकरणं सुरू होती. नऊ न्यायमूर्तींचे खंडपीठ, सात न्यायमूर्तींचे खंडपीठ आणि पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाचे निर्णय आम्ही दिले. सर्वोच्च न्यायालयाने कोणत्या खटल्याची सुनावणी करावी, हे कोणताही एक पक्ष किंवा व्यक्ती ठरवू शकतो का? सॉरी हा निर्णय फक्त सरन्यायाधीशच घेऊ शकतात.

आरोप फेटाळत चंद्रचूड म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाकडे मर्यादित साधने आणि न्यायाधीश देखील मर्यादित आहेत आणि म्हणूनच घटनात्मक प्रकरणे हाताळताना समतोल राखणं आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयात गेल्या २० वर्षांपासून अनेक महत्त्वाची प्रकरणे प्रतीक्षेत आहेत. ती जुनी प्रकरणे ऐकण्यापेक्षा अलीकडच्या प्रकरणांवर लक्ष केंद्रित करावे का? सर्वोच्च न्यायालयाचे प्राधान्य समाजासाठी महत्त्वाच्या असलेल्या घटनात्मक मुद्द्यांवर आहे.

संजय राऊत यांच्या आरोपावर बोलताना डी. वाय. चंद्रचूड म्हणाले की, काही राजकारण्यांना वाटतं की आम्ही त्यांचा अजेंडा पाळला तरच आम्ही स्वतंत्र आहोत. राजकीय अजेंड्यांनुसार न्यायालय चालेल अशी अपेक्षा करणं चुकीचे आहे.



## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# ...बळीराजाचे राज्य येवो!

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आणि निकाल पाहून सर्वांनाच काहीतरी वेगळे घडल्याचे जाणवले. अगदी विजयी पक्ष तसेच त्यांचे उमेदवार यांना जसा आश्चर्याचा धक्का बसला तसाच पराभूत पक्ष आणि त्यांच्या दिग्गज उमेदवारांनाही मोठा धक्का बसला. निवडणूक निकालात धक्के अपेक्षित असतात, पण हा निकाल सर्वांसाठी अनपेक्षित असाच होता. असे असले तरी महायुतीला अगदी स्पष्ट बहुमत मिळाले आहे आणि भाजपला सर्वाधिक म्हणजे १३२ जागांवर विजय मिळालेला आहे.

परिणामी राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होत आहे. यावेळी २३० जागांवर विजय मिळवणारी महायुती पाच वर्षे स्थिर सरकार देणारी असेल, अशी अपेक्षा धरायला हरकत नाही. नोव्हेंबर २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर जे काही घडले तेव्हापासून २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होईपर्यंत महाराष्ट्राने जे काही पाहिले ते सारे अभूतपूर्व होते. या पाच वर्षांतील महाराष्ट्रातील राजकारण कोणत्या मार्गाने गेले, कोणत्या थराला गेले हे पुन्हा उगाळण्याची गरज नाही. मात्र, राज्याला स्थिर सरकारची गरज होती, ती या निमित्ताने पूर्ण होत आहे.

रोजचे राजकीय आरोप-प्रत्यारोप, एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या, कुरघोडीचे राजकारण याला राज्यातील जनता अक्षरश: विटली होती. ही स्थिती कधी बदलणार, याची सर्वजण वाट पाहात होते. २० नोव्हेंबरला जनतेचा कौल मतदान यंत्रात बंद झाला आणि २३ नोव्हेंबरला तो कौल जगजाहीर झाला. त्यामुळे लोकसभा निवडणुकीचा निकाल कसा लागला, विधानसभा निवडणुकीचा निकाल असा कसा लागला, यावर फार चर्चा करण्यात अर्थ नाही. वास्तव स्वीकारून पुढे जाणेच योग्य आहे.

आता महायुती सरकारकडे संपूर्ण बहुमत असल्यामुळे आणि खुद्द भारतीय जनता पार्टी सरकारमध्ये असल्यामुळे हे सरकार कधीच पडणार नाही, हे सूर्यप्रकाशाइतकेच स्वच्छ आहे. त्यामुळे पाच वर्षे सरकारवर कुठलाही डाग पडणार नाही, अशी कामगिरी करण्याची जबाबदारी भाजपसह शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांवर आहे. हे जनतेचे सरकार आहे, हे सर्वसामान्यांचे सरकार आहे, बळीराजाचे सरकार आहे, पारदर्शकपणे काम करणारे सरकार आहे, अशा घोषणा आणि भाषणे देण्याची गरज आता कुणालाही नाही तर हे प्रत्यक्षात व्हायला हवे, हीच जनतेची आता अपेक्षा आहे.

आधीच्या अडीच वर्षांत सरकारने काहीच कसे काम केले नाही आणि नंतरच्या अडीच वर्षांत आम्हीच कशी कामे केली, हेदेखील वारंवार सांगण्याची गरज नाही. थोडक्यात, आता महायुती सरकारला मागे वळून पाहण्याची गरज पडणार नाही. राज्यात सत्ता, केंद्रात सत्ता, बाजूच्या गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेशमध्ये याच पक्षाची सत्ता असल्याने या राज्यातील महायुती सरकारला भविष्यात तक्रार करण्यासाठी कुठलीच संधी नाही. शिवाय विरोधकांची ताकद अवघ्या ४६ आमदारांवर आल्याने चिंतेचेही कारण नाही.

त्यामुळे पुढील पाच वर्षे केवळ विकासाचे आणि विकासाचेच राजकारण करायचे आहे, याची जाण सत्ताधारी ठेवतील, अशी जनतेची अपेक्षा आहे. यापुढे लाडक्या बहिणींना १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये मिळतील, १ रुपयाच्या पिकविम्यात शेतकऱ्यांना संपूर्ण नुकसानभरपाई मिळेल, शेतकऱ्यांना हमीभाव मिळेल, दूध उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर मिळेल, साखर कारखानदार सर्व शेतकऱ्यांच्या ऊसाचे गाळप करतील आणि नियमानुसार दर देतील, शेतकऱ्यांवर आत्महत्येचे प्रसंग येणार नाहीत, अशी अपेक्षा ठेवायला आता काहीच हरकत नाही.

किंबहुना, सरकारने सर्वांसाठी सर्वकाही केले म्हणूनच राज्यातील सूज्ञ जनतेने एकहाती महायुतीच्या हाती सत्तेची चावी दिली आहे. म्हणूनच राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे, केंद्राकडून मदत दिली जात नाही, अशा तक्रारी करण्याची सोय सरकारकडे राहिलेली नाही.


राज्यातील जनतेने मतदान करताना अनेक अपेक्षा ठेवल्या होत्या तर महायुतीतील घटक पक्षांनी त्यांचे जाहीरनामे, संकल्पपत्रातून दिलेल्या आश्वासनांची ते पूर्तता करतील, अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही. म्हणजे महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांची पोलीसदलात भरती होईल, राज्यातील महिलांवरील अत्याचार थांबतील एवढा कडक कायदा अस्तित्वात येईल, शेतकऱ्यांचे कर्ज माफ होईल, २५ लाख रोजगार निर्मिती होईल वगैरे वगैरे. राज्यातील आरक्षणाच्या महासंघर्षाला आता पूर्णविराम मिळेल, अशी अपेक्षाही बाळगायला हरकत नाही.

त्याचवेळी विरोधी पक्षाचे आमदार हेदेखील महाराष्ट्रातील आहेत, तेदेखील राज्यातील जनतेचे प्रतिनिधित्व करतात एवढे लक्षात ठेवून त्यांनाही विकासनिधी दिला जाईल, त्यांच्या भागातही विकासकामे होतील, याकडे महायुतीचे मुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि पालकमंत्री आवर्जून लक्ष देतील, ही अपेक्षा. महायुती सरकारमुळे राज्यात उद्योगधंदे येतील, राज्यातील बेरोजगारांना नोकऱ्या मिळतील, परकीय चलनचा ओघ वाढेल, अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरची होण्यासाठी राज्याकडून मोठा आर्थिक हातभार लागेल.

राज्याला महायुतीने दाखवलेली स्वप्नांची पूर्ती करण्याची जबाबदारी आता त्यांच्यावर आली आहे. महाराष्ट्राची सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती करायची असेल तर सर्वांना सोबत घेण्याची वृत्ती बाळगण्याची गरज आहे. आता पुढील निवडणूक पाच वर्षांनी आहे. त्यामुळे आता सर्वांनी एकत्र येऊन महाराष्ट्राच्या हिताचे निर्णय घेण्याची गरज आहे.

# शिक्षण हे परिवर्तानाचे हत्यार आहे : महात्मा फुले

**एकविसाव्या शतकाकडे नजर लावून बसलेल्या भारतात शिक्षण तळागाळापर्यंत पोहचू शकलेलं नाही हे वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आजही समाजात हक्कांची जाण आहे. पण कर्तव्याचा विसरच पडला आहे. आजही दीनदुबळे दलित अन्याय सोसतच आहेत. परहिता साठी अष्टाप्रहर राबणारा, झिजणारा शेतकरी, कामकरी, श्रमजीवी आजही दारिद्रयाचे आणि अन्यायाचे चटके अनुभवतच वाटचाल करत आहे. शहरे सोडली तर आजही खेडोपाडी, डोंगरी भागात छोटी छोटी मुलं कामाला जुपली जात असल्यानं शिक्षणाला वंचितच आहेत. शांतता वर्षातही शांतता औषधालाही नाही. उलट जिकडे तिकडे द्वेषाचे, विद्रोहाचे अशांत वातावरण खदखदत आहे. आजही साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे. महात्मा फुल्यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढली आणि ज्ञानांच दालन त्यांच्यासाठी खुले केले हे जरी खरे असले तरी विषमता आणि जातीभेद यांना आज देखील पूर्णपणे मुठमाती मिळू शकलेली नाही, ही वास्तविकता आहे.**



शिक्षणाचा प्रसार जर तळागाळापर्यंत झाला तरच क्रांती होईल असं तर ''विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली नीतीविना गती गेली गतीविना वित्त गेले आणि वित्तविना शुद्र खचले''. शंभर वर्षापूर्वीची हिच स्थिती आजही आहे. माणसाच्या समुद्रात आज माणुसकीच हरवली आहे. सामाजिक आणि आर्थिक विषमता याचं आजही पूर्णपणे उच्चाटन झालेले नाही. बंधुभाव फक्त ओठातच आहे.अशी स्थिती पाहिल्यावर महात्मा फुल्यांसारखी माणसं का बरं अस्वस्थ होणार नाहीत. आज जर महात्मा फुले आपल्यात असते तर त्यांनी आपल्या परखड विचारांच्या पवित्र्यांनी द्वेष, भ्रष्टाचार, अन्याय, दरिद्रय यांचा अंध:कार दूर करायचा नक्कीच प्रयत्न केला असता. आणि मग या विषयावर बोलायचा कदाचित प्रसंगही आला नसता.

हिंदू समाजातल्या मतलबी रुढींचा त्यांना तिरस्कार वाटू लागला. ज्योतिबांने शाळेतला अभ्यासक्रम पूर्ण करतांनाच १८४७ पर्यंत ज्योतिबा बुध्दिने चांगले प्रौढ झाले होते. त्यांनी समाजाचे बारकाईने निरीक्षण केले. त्यातून त्यांच्या असे लक्षात आले की, आपला हिंदु समाज जातीभेदाने आणि विशिष्ट वर्गाच्या गुलामगिरीत राहिल्याने प्रतिगामी बनला आहे. स्त्रियां आणि शुद्रांची कुचंबना होत आहे. हे सर्व स्त्रियां आणि बहुजन समाज शिक्षणापासुन दुर राहिल्यामुळे घडत आहे, असे त्यांच्या निदर्शनाला आले. त्यावरुन त्यांनी भावी जीवनातील कार्याची दिशा ठरविली. ते सरकारी नोकरीच्या मागे न लागता समाजकार्य करायचे ठरवून कामाला लागले. सामाजिक गुलामगीरी दूर करणे आणि सर्वांना शिक्षणाची दारे खुली करणे त्यासाठी प्रयत्नशील राहणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय ठरले.

हे कार्य तत्कालीन रुढीप्रिय समाजाला रुचले नाही. मुलींची शाळा काढण्यासाठी पूर्व तयारी म्हणून त्यांनी आपल्या पत्नीला प्रथम शिक्षण दिले. सावित्रीबाईंनी ही आपल्या पतीच्या जीवन कार्याला मनापासून सहाय्य केले. १८४८ मध्ये पहिली १८५१ मध्ये दुसरी आणि १८५२ मध्ये तिसरी मुलींची शाळा काढली. या शाळा व्यवस्थित चालू लागल्या. मेजर कँडी यांनी सरकारतर्फे ७५ रुपये अनुदान मंजुर केले. फुले यांच्या या महान सामाजिक कार्याचा गौरव म्हणुन त्यांचा सत्कार ही करण्यात आला. या नंतर ज्योतिबांनी सामाजिक सुधारणेकडे विशेष लक्ष द्यायचे ठरविले. व्यक्ति स्वातंत्र्य, समता आणि बुध्दि प्रामाण्य यासाठी ते झगडू लागले. सतीची प्रथा, विधवा पूर्नविवाह, भृणहत्या (लहान मुलांची हत्या) या समाज विघातक गोष्टींना त्यांनी विरोध केला. केवळ शाब्दिक विरोध न करता त्यांनी पुढाकार घेवून ''बालहत्या प्रतिबंधगृह'' ही संस्था सुरु केली. समाजस्पृश्य-अस्पृश्य असा भेदाभेद पाळणाऱ्याचा रोष पत्करुन त्यांनी आपल्या घरी असलेला पाण्याच्या हौद सर्वांना म्हणजे अस्पृश्यांनाही खुला केला.

शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हे लक्षात येताच अस्पृश्यासाठी, स्त्रियांसाठी त्यांनी शाळा उघडल्या, अनाथाश्रम काढले, वृत्तपत्र काढले. धर्म जन्माने न मिळता माणसाच्या स्वत:च्या बुध्दीने स्विकारला पाहिजे. शेतकयांच्या व्यथा इंग्रज प्रशासनाच्या कानी पोहोचविल्या. शेतकरी हा समाजाचा कणा आहे. पोशिंदा अन्नदाता आहे, असे मत मांडले आणि जगजागृती केली. त्यांच्या साठाव्या वर्षी जनतेने मुंबईस त्यांचा नेत्रदिपक सत्कार करुन त्यांना ''महात्मा'' ही पदवी बहाल केली. सामाजिक समता, आर्थिक न्याय व शोषणमुक्ती यासाठी ज्योतिबाने अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. त्यांच्या पुरोगामी विचारांना कृतीची जोड मिळाली जणू ती मानवतेच्या कणवतेची बैठक होती. ज्योतिबांच्या कृतीमुळे, कर्तृत्वामुळे या समाजाची नवी पहाट उदयास आली. सावित्रीमाई भारतातील आद्यक्रांतीकारी थोर स्त्री होती. ज्योतिबांना सावित्रीमाईची सक्रीय साथ लाभली. सामाजिक सुधारणेची सुरुवात आपल्या घरापासुन करणारे ज्योतिबाफुलें सारखे समाजसुधारक युगात होणे अशक्य आहे. सुधारकाग्रणी, संपूर्ण महाराष्टाचे भुषण, सुधारकांचे सुधारक त्यांच्या विचारांनी आणि धाडसी वृत्तीने कृत्तीने समाजाला जागे केले. काळाच्या खूप पुढे जाण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. हीन-दीन-जीवांना एकोणिसाव्या शतकात त्यांनी आपल्या विशिष्ट ध्येयासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले.

मानवी सामाजिक सुधारणेचे अवलोकन केले, परिस्थितीचे अवलोकन केले आणि प्रकाशमय मानवी स्वातंत्र्याच्या दिव्य युगाकडे सामाजिक माणसाच्या नवयुगाची ग्वाही देणारा आधुनिक भारतातील पहिला समाजक्रांतीकारक क्रांतिबा ज्योतिराव फुले नावाचा धगधगता लाव्हा तयार झाला. कारण देशात जातीभेदाची सुनामी ऊफाळुन आली होती. त्यामुळे कोणी शुद्र नदीकाठावर वस्त्रधुत असता तेथे एखादा भट आला तर शुद्रास आपली सर्व वस्त्रे गोळा करुन भटाच्या अंगावर शिंतोडा येण्याचा संभव नाही, अशास्थळीजाऊन वस्त्रे धुवावी लागत. भटाच्या अंगावर नकळत पाण्याचा शिंतोडा उडालाच तर भटाने रागाने अग्नीसारखे तप्त होऊन आपल्या जवळचे जड भांडे शुद्रांच्या डोक्यावर मारावे, ब्राम्हणावर तर सावली सुध्दा पडू नये याची पूर्णपणे खबरदारी शुद्राने वस्तीतून वाट असेल त्या वाटेवरुन जाण्यास सुध्दा धोका पत्करु नये असा कायदा, अशा कायद्याचे राज्य होते, त्यामुळे राज्यात अनेक छळवाद होते. स्त्रियांना तर त्या रुढीने बंदीस्तच करुन ठेवले होते. पुरुषप्रधान व्यवस्थांच्या रणधुमाळी विषयी फुले म्हणतात की, स्त्री ही जात अबला असल्यामुळे तिच्यापूढे लोभी व धाडसी पुरुषांनी स्वत:चेच म्हणणे खरे केले आणि स्त्रीयांना मानवी हक्क समजू नयेत म्हणून पूर्ण अंधारात ठेवले. ज्योतिरावांना सावित्रीमाईंची भक्कम साथ मिळाल्यानंतर त्यांनी विचार केला की, हे आता शुद्र अतिशुद्रांचा छळवाद बदलला पाहिजे. त्यावेळे पासून स्त्री चळवळीचा जन्म झाला.

महात्मा फुले आज जरी आमच्यात नाहीत परंतु कर्तृत्वाच्या रुपाने ते निश्चितच आमच्यांत आहेत. कारण जे दुस-यांसाठी मरतात, तेच खया अर्थानं जगतात आणि आपल्या कार्यकर्तृत्वाच्या रुपानं अमर असतात, म्हणजेच आपल्यातच असतात. आता हे जर खंर असेल तर महात्मा फुले देखील कार्यरुपानं आपल्यातच आहेत, असं नाही का तुम्हाला वाटत? मला तर वाटतं, या विषयाच्या निमित्तानं ज्ञानज्योतीचं चरित्र आणि चारित्र्याचा आचार, विचार आणि उच्चाराचा जवळून परिचय व्हावा आणि आपण त्यांचे कार्य जोमानं, जिद्दीनं आणि निष्ठेनं करावं असंच बहुधा बहुतेकांना अपेक्षित असावं लौकिकर्थानं आज जरी महात्मा फुले आपल्यात नसले, तरी त्यांचे अलौकिक कार्य कलेकलेनं वाढतच राहणार आहे.आणि त्यांचे अस्तित्व तर नेहमीचे आपल्यात राहणार आहे.

ज्ञानज्योत प्रज्वलित केलेल्या ज्योतिबांना सामाजिक समता, मानवता, विवेक, विनय आणि नम्रता यावर प्रकाश टाकुन राष्ट्राला स्वायत्ततेच ध्येय गाठण्यासाठी गतिमान बनवायचं होतं. समाजजागरणाचा वसा घेतलेले स्त्रीशिक्षण आणि स्त्रीशक्ति जागृतीचा मंत्र निनादात ठेवणारे, आणि अस्पृश्यांबद्दल कणव आणि बंधुता बाळगणारे ज्योतिबा आज असते तर ! खरंच काय बरं वाटलं असतं त्यांना ? आजही समाजात समता आणि बंधुता पूर्णपणे उतरु शकली नाही हे पाहून ते नक्कीच अस्वस्थ झाले असते. जयंती आणि पुण्यतिथी या दोन दिवशी आपली आठवण ठेवणारे, याच दिवशी आपल्या पुतळयाला हार घालून खोटी पूजा करुन अवडंबर माजवणारे तथाकथित कार्यकर्ते आणि पुढारी पाहून त्यांना नक्कीच चीड आली असती.

६३ वर्षे चंदनासारखे झिजले. प्रवास केला, व्याख्याने दिली, लेख लिहिले. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान, इहवाद या आधुनिक मुल्यांवर भर देऊन सामाजिक क्रांतीची प्रेरणा दिली. डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरु मानले. सहज सोप्या भाषेत नेमकी स्पष्टता आणणे त्यांना जमत असे. विचारांना कृतिशीलतेची जोड दिली. "जैसे बोलावे, तैसे चालावे, मग महंतलीला स्वभावे, अंगी बाणे" या समर्थवचनाची सार्थकता सिध्द करणारा हा महात्मा सर्व सुखाचे आगर नीतितत्त्वांचे माहेर अशा हया महात्म्याचे अविरत कष्टाने २८ नोव्हेंबर १८९० मध्ये अनंतात विलीन झाले, त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

- प्रविण बागडे, नागपूर

# डोंबिवलीतील ६५ बेकायदा इमारती जमीनदोस्त करा

## उच्च न्यायालयाचे कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाला आदेश

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण)** - डोंबिवलीत पाच वर्षाच्या कालावधीत बांधकामधारकांनी कल्याण डोंबिवली पालिकेच्या बनावट इमारत बांधकाम परवानगी कागदपत्रांच्या आधारे ६५ बेकायदा इमारती उभारल्या. या बेकायदा इमारतींना महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून या इमारती अधिकृत असल्याचे दाखवून या इमारतींमधील सदनिका घर खरेदीदारांना विकल्या.

बनावट कागदपत्रांच्या आधारे या इमारतींची उभारणी करून नागरिकांची फसवणूक केल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी या सर्व बेकायदा इमारती येत्या तीन महिन्याच्या कालावधीत तोडण्याचे आदेश कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाला दिले आहेत.

या बेकायदा इमारतींमध्ये रहिवास असल्याने या इमारती रहिवासमुक्त करण्यासाठी स्थानिक पोलिसांना आवश्यक पोलीस बंदोबस्त देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. ६५ बेकायदा इमारतींवर कारवाई करावी म्हणून वास्तुविशारद व याचिकाकर्ते संदीप पाटील यांनी कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करत होते.

पालिका अधिकाऱ्यांकडून या बेकायदा बांधकामांविरुध्द कारवाई होत नसल्याने पाटील यांनी तीन वर्षापूर्वी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. या बेकायदा इमारतींची बनावट कागदपत्रे, महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून उभारणी करण्यात आली होती.

## पान १ वरून...

### ▶▶|मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर...

आरोपी हा बनावट भारतीय पासपोर्ट वापरत असल्याचे तपासात समोर आले आहे. अधिकाऱ्यांनी त्याची चौकशी केली असता, तो बनावट पासपोर्ट वापरून चीन आणि संयुक्त अरब अमिराती UAE या दोन्ही देशांमध्ये प्रवास करत असल्याचे आढळले. पुढील तपासानंतर, त्याने उघड केले की तो बांगलादेशी नागरिक होता आणि २६ वर्षांपासून भारतात बेकायदेशीरपणे राहत होता," असे एका अधिकारींनी सांगितले.

### ▶▶|पुणे पोलिसांचा लाडका मित्र लियो...

लिओ हा गेल्या काही दिवसांपासून आजारी होता. त्याला अन्ननलिकेचा आजार होता. त्याच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचार सुरू असतांना त्याची प्राणज्योत मालवली.

लिओवर महापालिकेच्या पशू दाहिनीमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या शरीरावर तिरंगा झेंडा गुंडाळण्यात आला होता. तर, पोलिसांनी त्याला अंत्यसंस्कारापूर्वी बंदुकीच्या २१ फैरीझाडून मानवंदना देखील दिली. यावेळी अनेकांना अश्रु अनावर झाले होते. यावेवली गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक पोलीस आयुक्त, एमओबीचे पोलीस निरीक्षक, श्वान पथकाचे अधिकारी व कर्मचारी, सलामी गार्ड उपस्थित होते.

### ▶▶|नाशिकच्या खैर तस्करीचे धागेदोरे थेट...

त्यातील दोघे उत्तर प्रदेशमधील तर उर्वरित दोघे गुजरातचे आहेत. या चौघांनी नाशिक मधून खैराची तस्करी करून ती चिपळूण मधल्या काही कात फॅक्टरींना विकल्याचे समोर आले आहे. त्यानंतर अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक ऋषिकेश रंजन व मुख्य वनसंरक्षक रामानुजन कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली चिपळूणची माहिती घेऊन आम्ही चिपळूणला आलो. मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे यांनी स्थानिक पातळीवर सहकार्य केले. वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश गवारी, वनपरिक्षेत्र अधिकारी सविता पाटील वनपाल दुसाने, सूर्यवंशी, गायकवाड व इतर वनाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने सावर्डे-कुंभारवाडी येथील सिंडिकेट फूड्स फॅक्टरीवर धाड टाकली. या धाडीत मोठ्या प्रमाणात अवैध खैरसाठा आढळला. या कारवाईदरम्यान फॅक्टरीचे मालक विक्रांत तेटांबे तिथून पळून गेल्याचे लक्षात आले. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना समन्स बजावला आहे. या फॅक्टरीमधील कागदपत्रे व पुस्तके, वाहतूक पासेस, टॅबलेट पुढील चौकशीसाठी जप्त केले आहे. या फॅक्टरीमध्ये मोठ्या प्रमाणात कात ज्यूस व रेडिमेड कात आढळला आहे. हा कात नाशिकच्या जंगलातील खैर लाकडापासून बनवल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने फॅक्टरीला सील ठोकण्यात आले आहे. या कंपनीतून एकूण ८० लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### ▶▶|माहिती नाकारल्याने राज्य माहिती...

या सुनावणीत निवृत्त तलाठी आणि जनमाहिती अधिकारी चंद्रकांत सावळे आणि विद्यमान तलाठी गौरव पारधी यांच्यावर अर्जदाराला वेळेत योग्य माहिती न दिल्याचा ठपका ठेवण्यात आला. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अंतर्गत दोन्ही अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करून २५ हजार रुपयांचा दंड (शास्ती) लावण्याचे आदेश दिले. या दंडाची रक्कम सावळे यांच्या निवृत्ती वेतनातून वसूल केला करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

विद्यमान तलाठी आणि जनमाहिती अधिकारी गौरव पारधी यांना अर्जदार हेण्ड्रीक्स यांना १५ दिवसांच्या आत नि:शुल्क माहिती पुरविण्याचे आदेश खंडपीठाने दिले आहेत. याशिवाय वसईच्या तहसिलदारांना अर्जदारांना माहिती का दिली गेली नाही याबाबत शपथपत्र सादर करण्याचेही आदेश दिले आहेत.

### ▶▶|रुग्णवाहिका व्यवस्थेच्या हलगर्जीपणामुळे...

परंतु, ऑक्सिजनसारख्या अत्यावश्यक सुविधांचा अभाव असल्याने रुग्णवाहिका तातडीने उपलब्ध झाली नाही.

या विलंबामुळे गर्भवती महिलेच्या जीवाला धोका निर्माण झाला. रुग्णालय प्रशासनाने कासा उपजिल्हा रुग्णवाहिका तातडीने उपलब्ध करून दिली. मात्र, तोपर्यंत महिलेने प्रसूतीच्या तीव्र वेदना सहन केल्या. त्यानंतर डॉक्टर व उपचार सुविधा उपलब्ध नसलेल्या एका रुग्णवाहिकेतून पिंकी यांना वलसाड येथे घेऊन जात असताना गुजरातच्या भिलाड जवळ पोहोचताच तिचा तिच्या पोटातील बाळासह मृत्यू झाला. याआधीही आरोग्य व्यवस्था व रुग्णवाहिका व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभाराचा फटका अशा अनेक गरोदर मातांना बसलेला आहे व त्या दगावल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत. आरोग्य व्यवस्थेतील हलगर्जीपणामुळे एका गर्भवती महिलेचा जीव गेल्याने प्रशासनावर टीकेची झोड उठली आहे. वेळेवर आणि योग्य सुविधा पुरवण्यात प्रशासन अपयशी ठरत असेल, तर याचा फटका सामान्य नागरिकांना बसणार हे निश्चित आहे. त्यामुळे ही यंत्रणा सक्षम आणि गतिमान करण्यासाठी ठोस उपाययोजना करणं गरजेचं आहे.

### ▶▶|'माझ्या शरीरात रक्ताचा थेंब असेपर्यंत मी...

आता आम्हाला चांगलं महायुतीचं सरकार स्थापन करायचं आहे. महायुती मजबुतीने काम करणार आहे. उद्या आमची दिल्लीला अमित शहांसमोर बैठक होणार आहे. तिन्ही पक्षांची बैठक असेल, त्यांच्यासमोर चर्चा होईल. त्यात निर्णय होईल. मी मोदी, शाह यांच्याशी फोनवर बोललो. सरकार स्थापन करण्यात कुठलाही अडथळा नाही. जो वरिष्ठ निर्णय घेतील त्याला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. अमित शहांसोबत बैठक आहे. त्यात जी चर्चा होईल, निर्णय होईल. मोदींना मी सांगितलं आहे की, जो निर्णय घ्यायचा आहे तो घ्या. एकनाथ शिंदे तुमच्यासोबत आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ‘स्पर्धा परीक्षांना सकारात्मकतेने सामोरे जा, प्रयत्नात सातत्य ठेवा!’

■ लोहमार्ग, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांचे प्रतिपादन
■ स्पर्धा परीक्षा देणाऱ्या परिक्षार्थींना केले मार्गदर्शन
■ ठाणे महापालिका संचालित सी. डी. देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेत झाले व्याख्यान





**ठाणे (रोहित जैसवार) :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेप्रमाणेच कोणत्याही स्पर्धा परीक्षेत यश संपादन करायचे असेल तर भावनिक बुध्दिमत्ता महत्त्वाची आहे. सर्व परीक्षार्थींनी या परीक्षांना सकारात्मकतेने सामोरे जावे आणि त्या प्रयत्नात सातत्य ठेवावे, असे प्रतिपादन मुंबई लोहमार्ग, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी केले आहे.

ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतर्फे, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार स्पर्धा परीक्षेच्या परीक्षार्थींसाठी नुकतेच डॉ. रवींद्र शिसवे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, संस्थेचे संचालक महादेव जगताप यांनी डॉ. शिसवे यांचे स्वागत केले.

सन २००१च्या आयपीएस बॅचचे अधिकारी असलेले डॉ. रवींद्र शिसवे यांनी यावेळी ठाणे आणि मुंबईतून स्पर्धा परीक्षांना बसलेल्या परीक्षार्थींशी संवाद साधला. अभ्यासाबाबत संवेदनशीलता, सकारात्मकता महत्त्वाची आहे. त्याचवेळी, समाजातील नकारात्मक लोकांपासून दूर राहणे, अभ्यासाचे योग्य पध्दतीने नियोजन करणे, त्यासाठी वेळेची आखणी करणे आवश्यक असल्याचे डॉ. शिसवे यांनी सांगितले. केलेल्या अभ्यासाची पेन्सिल उजळणी करणे, विचार करण्याची पद्धत कशी विकसित करायची, महत्त्वाचे मुद्दे कसे काढायचे याच्याबद्दलही डॉ. शिसवे यांनी मार्गदर्शन केले. तसेच, अभ्यासाच्या नोट्स काढताना शॉर्ट हॅण्ड कौशल्याचा वापर करण्याचीही सूचना त्यांनी केली.

कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी संयम, प्रामाणिकपणा, सातत्य, आत्मविश्वास महत्त्वाचा आहे, असेही डॉ. शिसवे म्हणाले. विविध उदाहरणे देत डॉ. शिसवे यांनी हा संवाद साधला. परीक्षार्थींच्या प्रश्नोत्तरांनी या सत्राची सांगता झाली. संस्थेचे गिरीश झेंडे या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

## नवनिर्वाचित आमदार सुलभा गायकवाड अग्नी तांडवात उध्वस्त झालेल्या जोशी कुटुंबियांच्या मदतीला धावल्या



**कल्याण (गणेश बागडे) :** कल्याण पूर्व मतदार संघातील माणेरे गाव, जोशी पाडा येथील रहिवाशी रघुनाथ जोशी यांच्या घराला पहाटे चारच्या सुमारास भीषण आग लागली. घरातील सर्व सामान जळून खाक झाले. घरात झोपलेले २७ जण थोडक्यात बचावले. आगीच स्वरूप इतकं भीषण होत की यात त्यांच्या घराचे पूर्णपणे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही. या घटनेची माहिती मिळताच नवनिर्वाचित आमदार सुलभा गायकवाड यांनी तात्काळ घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देऊन पीडित कुटुंबाची विचारपूस केली. त्यांचे झालेले नुकसानाची शासकीय अधिकाऱ्यांकडून पंचनामा करून त्यांना लवकरात लवकर शासकीय नुकसान भरपाई मिळावी यासाठी अधिकाऱ्यांना आदेश दिले. या दुःखद प्रसंगातून जोशी कुटुंबियांना त्यांचे पुनर्वसनासाठी माझ्याकडून सर्व आवश्यक ती मदत मी सढळ हस्ते करेन असे आश्वासन आमदार सुलभा गायकवाड यांनी पीडित कुटुंबाला दिले. यावेळी माणेरे गावचे विजयी जोशी तसेच स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

## कळवा, मुंब्रा आणि दिवा परिसरात शुक्रवारी पाणी नाही



**ठाणे (दिगंबर जाधव) :** एमआयडीसीमार्फत जलवाहिनीच्या देखभाल दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार असून या कामामुळे कळवा, मुंब्रा आणि दिवा भागाचा पाणी पुरवठा शुक्रवारी दिवसभर बंद राहणार आहे. या बंदनंतर पुढील काही तास कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे. यामुळे येथील नागरिकांना पाणी टंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनेतील कटाई नाका ते मुकंद कंपनीपर्यंतच्या जलवाहिनीवर तातडीच्या देखभाल दुरूस्तीचे काम करण्यात येणार आहे. या कामामुळे, गुरूवार, २८ नोव्हेंबर रात्री १२ वाजेपासून ते शुक्रवार, २९ नोव्हेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत असा २४ तासांसाठी कटाई ते ठाणे दरम्यान पाणी पुरवठा बंद राहणार आहे. परिणामी या काळात ठाणे महापालिका क्षेत्रातील कळवा, मुंब्रा आणि दिवा परिसरात पाणी पुरवठा बंद राहणार आहे. पाणी पुरवठा पूर्ववत झाल्यानंतर पुढील काही तास कमी दाबाने पाणी पुरवठा होईल. त्यामुळे या काळासाठी नागरिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा, तसेच, पाणी जपून वापरावे, असे आवाहन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## ठाणे महापालिकेत घेण्यात आली बालविवाह मुक्त भारताची शपथ




**ठाणे (यश सावंत) :** बालविवाह मुक्त भारत या राष्ट्रीय अभियानास आज दिल्ली येथे प्रारंभ झाला. केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी आणि राज्यमंत्री सावित्री ठाकूर यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमात, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. याप्रसंगी उपस्थितांनी बालविवाह मुक्त भारताची शपथही घेतली.

केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयातर्फे नवी दिल्लीत विज्ञान भवन येथे या अभियानाचा आरंभ करण्यात आला. त्यात देशभरातून ऑनलाइन पद्धतीने नागरिकही सहभागी झाले. बालविवाह मुक्त भारत या पोर्टलचेही याप्रसंगी अनावरण करण्यात आले. ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या कार्यक्रमात, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, महिला व बालविकास अधिकारी दयानंद गुंडप आदी उपस्थित होते.

यावेळी, ठाणे महापालिका क्षेत्रातील नोंदणीकृत बचत गटाच्या महिला, विद्यार्थी, अधिकारी आणि कर्मचारी यांनी बालविवाह मुक्त भारताची सामुहिक शपथ घेतली.

## कल्याणमधील सापर्डे गाव परिसरात गूढ हादरा, नागरिक भयभीत



**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण जवळील सापर्डे परिसरात मंगळवारी रात्री साडे आठ वाजण्याच्या दरम्यान गूढ हादरा बसला. या धक्क्याने काही वेळ सापर्डे परिसरातील नागरिक भयभीत होऊन घराबाहेर आले. काही क्षण नागरिकांना भूकंप झाल्यासारखे जाणवले.

या गूढ हादऱ्याविषयी शासकीय यंत्रणांकडून कोणतीही अधिकृत माहिती आतापर्यंत देण्यात आली नाही. मंगळवारी कल्याण मधील आधारवाडी भागात व्हर्टेक्स गृहसंकुलाला भीषण आग लागली होती. या कालावधीतच सापर्डे परिसरात जमिनीला जोरदार हादरा बसल्याचे स्थानिक रहिवाशांना जाणवले. घरांमधील नागरिक या गूढ हादऱ्याने घराबाहेर आले. नंतर हा हादरा थांबला. काही क्षण हा प्रकार घडल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले.

## पालिकेच्या परिवहन सेवेच्या भंगार बसला आग लागण्याचे सत्र सुरूच



**वसई (सुचिता सोनावणे) :** नालासोपारा पूर्वेच्या भागात पालिकेच्या परिवहन सेवेच्या भंगार बसला आग लागण्याचे सत्र सुरूच आहे. बुधवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास पुन्हा एकदा भंगार बस ने पेट घेतला आहे. या आगीवर पालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळविले आहे. नालासोपारा पूर्वेकडील सनशाइन येथे महापालिकेने भंगार झालेल्या परिवहन सेवेच्या बसेस ठेवण्यात आल्या आहेत. या बसेस अजूनही हटविण्यात न आल्याने सातत्याने आगी लागण्याच्या घटना समोर येत आहेत.

बुधवारी पुन्हा एकदा अचानकपणे या बसेसला आग लागल्याने खळबळ उडाली होती. या घटनेची माहिती नागरिकांनी तात्काळ महापालिकेच्या अग्निशमन दलाला दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू केले. या आगीमुळे आजूबाजूच्या परिसरात धुराचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या आगीत कोणतीच जीवितहानी झाली नसून भंगार बस यात जळून खाक झाली आहे. या भंगार बस पडून असल्याने धूम्रपान करण्यासाठी चरसी व गर्दुल्ले यांचा वावर वाढला आहे. या ठिकाणी आगी लागत नसून त्या लावल्या जात असल्याचा आरोप भाजपचे अल्पसंख्याक जिल्हा प्रभारी मुज्जफर घनसार यांनी केला आहे.

या अशा प्रकारामुळे येथून प्रवास करण्यास नागरिकांना अडचणी येत आहेत. यासाठी या बस हटवा अन्यथा नवनिर्वाचित आमदार यांना सोबत घेऊन पालिकेच्या समोर आंदोलन करू असा इशारा त्यांनी दिला आहे. यापूर्वी रविवारी रात्रीही आग लागून सहा बस जळल्या होत्या

## पाचपाखाडी भागातील ठाणे महापालिका मुख्यालय इमारतीत उंदरांचा सुळसुळाट; कार्यालयात दिसले पिंजरे



**ठाणे (सचिन कदम) :** ठाणे शहराच्या कारभाराचे मुख्य केंद्र असलेल्या पाचपाखाडी भागातील ठाणे महापालिका मुख्यालय इमारतीत उंदरांचा सुळसुळाट झाला आहे. अधिकाऱ्यांच्या कार्यालयात असलेल्या महत्वाची कागदपत्रे उंदिर कुरतडण्याची भिती व्यक्त होत असून या भितीतूनच अधिकाऱ्यांनी आता आपल्या कार्यालयात उंदिर पकडण्यासाठी पिंजरे ठेवली आहेत. या उंदरांच्या सुळसुळाटामुळे अधिकारी आणि कर्मचारी हैराण झाल्याचे चित्र आहे.

ठाणे महापालिकेचा कारभार पाचपाखाडी येथील पालिका मुख्यालय इमारतीतून चालतो. ही तळ अधिक चार मजली इमारत आहे. या इमारतीत आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा, घनकचरा, शहर विकास, आरोग्य विभाग आणि इतर विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची कार्यालये आहेत. याशिवाय, महापालिका मुख्यालय इमारतीत पालिका पदाधिकारी आणि राजकीय पक्षांची कार्यालये आहेत. ठाणे शहराच्या कारभाराचे केंद्र म्हणून पालिका मुख्यालय इमारत ओळखली जाते. शहरातील अनेक विकास कामांचे प्रस्ताव तयार करून त्याची अंमलबजावणी पालिका करते. या सर्व प्रस्तावांच्या फाईल पालिका मुख्यालयात ठेवण्यात येतात. परंतु या फाईलमधील कागदपत्रे उंदीर कुरतडण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रत्येक अधिकाऱ्यांच्या कार्यालयामध्ये आणि टेबलांवर महत्वाच्या फाईल ठेवलेल्या असतात. या फाईल उंदरांकडून कुरतडली जाण्याची भिती अधिकाऱ्यांना वाटू लागली असून ते अशा महत्वाच्या फाईल सुरक्षित ठेवण्यासाठी जागा शोधताना दिसून येत आहेत.

## आंबा फळपिकासाठी फळपिक विमा योजनेत सहभागासाठी ३० नोव्हेंबर अंतिम तारीख



**ठाणे (विशाल पाटील) -** येत्या आंबिया बहारामध्ये विविध हवामान धोक्यामुळे आंबा फळपिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी कृषि विभागामार्फत पुनर्रचित हवामानावर आधारीत फळपिक विमा योजना राबविण्यात येत आहे. योजनेमध्ये सहभागाकरिता 30 नोव्हेंबर 2024 अंतिम मुदत आहे. अवेळी पाऊस, कमी / जास्त तापमान ,वेगाचा वारा, गारपीट या हवामान धोक्यापासून निर्धारित केलेल्या कालावधीत सहभागी होऊन आंबा फळबागांचे संरक्षण करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रामेश्वर पाचे यांनी केले आहे.

योजनेची वैशिष्ट्ये :-

ठाणे जिल्ह्यामध्ये अधिसूचित केलेल्या महसूल मंडळात आंबा पिकाच्या उत्पादनक्षम फळबागांना विमा संरक्षण देण्यात येईल.

कर्जदार शेतकरी व बिगर कर्जदार शेतकरी यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक असेल.

खातेदार शेतकरी व्यतिरिक्त कुळ व भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी यांनाही सदर योजना लागू राहील. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरार पिक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे.

या योजनेत प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरीता एका फळपीकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे (०.१० हे) अशी मर्यादा राहील. तसेच जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा ही सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून प्रती शेतकरी ४ हे. मर्यादेपर्यंत राहील. विमा अर्जासोबत फळबागेचा Geo Tagging असलेला फोटो विमा पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य राहील.

एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग व आंबिया बहारापैकी कोणत्याही एकाच बहाराकरीता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल.

ही योजना ठाणे जिल्ह्यामध्ये बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लि.(टोल फ्री नं. १८००२०९५९५९) मार्फत राबविण्यात येत आहे.

फळपिक विमा योजनेमध्ये सहभागी होण्याची अंतिम मुदत आंबा पिकाकरीता दि.३० नोव्हेंबर आहे.

सदर फळपीक विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतक-यांनी ई - पीक पाहणी करणे बंधनकारक आहे.

विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विमा नुकसान भरपाई मिळणेसाठी शेतकऱ्याचे बैंक खाते आधार आधारित पेमेंटसाठी लिंक असावे.

फळपिक विमा योजनेअंतर्गत हवामान धोक्याचा ट्रिगर कार्यान्वित झाल्यास त्या महसूल मंडळातील त्या पिकासाठी भाग घेतलेल्या शेतकऱ्यास नुकसान भरपाई रक्कम संबंधित विमा कंपनीकडून देण्यात येणार आहे.

विमा संरक्षणाचे केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच लागू आहे. विहित वयापेक्षा कमी वयाच्या फळबाग लागवडीस विमा संरक्षणाची नोंद झाल्याचे पडताळणीत निदर्शनास आल्यास विमा संरक्षण केव्हाही संपुष्टात येईल आणि शेतकऱ्याने भरलेला विमा हप्ता जप्त होईल. योजनेत भाग घेण्यासाठी आंबा फळपिकाचे उत्पादनक्षम वय ५ वर्षे आहे.

## वृद्धाची ६८ लाख रुपयांना फसवणूक

**ठाणे (विशाल कारंडे) :** आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात सहभाग असल्याचे भासवून एका भामट्याने ७८ वर्षीय व्यक्तीची ६८ लाख रुपयांना फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाण्यात वृद्ध व्यक्ती त्यांच्या पत्नीसोबत वास्तव्यास आहेत. बँक खात्यातील बचत आणि पत्नीच्या निवृत्ती वेतनावर त्यांचे कुटुंबखर्च चालतो. २२ नोव्हेंबरला त्यांना एका व्यक्तीने संपर्क साधला. त्यांना क्रेडीट कार्ड पाठविण्यात आले असून त्याचे एक लाख रुपये थकित असल्याचे त्या व्यक्तीने त्यांना सांगितले. परंतु मी कोणतेही क्रेडीट कार्ड वापरीत नसल्याचे वृद्धाने त्याला सांगितले. त्यानंतर त्या व्यक्तीने आपण व्यवस्थापकाला संपर्क जोडून दिला. त्यावेळी त्या व्यवस्थापकाने तुमची फसवणूक झाली असून मुंबई सायबर पोलिसांना संपर्क करून देतो अशी बतावणी केली. काहीवेळाने वृद्धाला एक व्हिडीओ कॉल प्राप्त झाला. त्यावेळी त्यांच्या समोर पोलिसांच्या गणवेशातील एक व्यक्ती होता. त्याने आपण सायबर पोलीस अधिकारी रवी कुमार असल्याचे सांगितले. त्या व्यक्तीने वृद्धाकडून आधारकार्ड क्रमांक मागितला. वृद्धाने आधारकार्डची माहिती दिल्यानंतर त्या व्यक्तीने या आधारकार्डचा वापर करून आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे सांगितले. तसेच त्यांना आणि त्यांच्या पत्नीला या प्रकरणात अटक होऊ शकते अशी बतावणी केली. तसेच हे प्रकरण सीबीआयला वर्ग करण्यात आल्याचेही त्या भामट्याने सांगितले.

# प्रिया बापटने लाइव्ह कॉन्सर्टमध्ये गायलं गाणं; पती उमेशनेही केलं कौतुक

अभिनेत्री प्रिया बापट ही तिच्या अभिनयासाठी ओळखली जाते. आतापर्यंत तिने चित्रपट, मालिका, वेब सीरिज या माध्यमांतून विविध भूमिका साकारत प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. मराठीसह तिने हिंदी भाषेतदेखील काम केले आहे, त्यामुळे तिचा मोठा चाहतावर्ग आहे. याबरोबरच प्रिया तिच्या गाण्यांसाठीदेखील ओळखली जाते. तिने गायलेली गाणी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरताना दिसतात. सोशल मीडियावर प्रिया बापट तिने गायलेल्या गाण्यांचे व्हिडीओ शेअर करताना दिसते.



प्रिया बापटने लाइव्ह कॉन्सर्टमध्ये गायलं गाणं

आता अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती एका कॉन्सर्टमध्ये गाताना दिसत आहे. हा व्हिडीओ शेअर करताना तिने एक पोस्टदेखील लिहिली आहे. एक स्वप्न जगल्याचे तिने या पोस्टमध्ये म्हटले आहे.

प्रिया बापटने तिच्या पोस्टमध्ये लिहिले, "ही जादुई संध्याकाळ मी कायम जपून ठेवेन. इंडियन ओशन कॉन्सर्ट मध्ये लाइव्ह गाणे सादर करेन अशी कल्पनाही केली नव्हती. माझ्या कॉलेजच्या दिवसांपासून ज्या बँडचे मी कौतुक केले आहे, ज्यांचे संगीत मला आवडते आणि ते मी जगले आहे, त्यांनी माझे खूप प्रेमाने स्वागत केले. एकच ग्रीन रूम शेअर करणे, त्यांना बॅकस्टेजवर भेटणे आणि संगीताबद्दलचे प्रेम एकत्र साजरे करणे हे स्वप्नवत होते. त्यांच्यासोबत त्या मंचावर उभे राहणे हा एक सन्मान होता, जो मी कधीही विसरणार नाही. गर्दी ज्या प्रकारे नाचत होती, जल्लोष करीत होती, बरोबरीने गाणे गात होती ते पाहणे जादूई होते. त्यांचे संगीत ऐकत मोठे झालेले पालक आता त्यांच्या मुलांना त्यांची ओळख करून देत आहेत. या सगळ्याचा साक्षीदार होणे खूप खास होते. मला माझे स्वप्न जगू दिल्याबद्दल आणि ३५ वर्षांपासून हृदयाला भिडलेल्या त्यांच्या अविश्वसनीय संगीताबद्दल मी या दिग्गजांची आभारी आहे. ती खरोखर आठवणीत ठेवावी अशी रात्र होती!", असे लिहित शेवटी तिने इंडियन ओशन कॉन्सर्टला टॅग करत धन्यवाद म्हटले आहे. प्रियाने गायलेल्या गाण्याचा व्हिडीओ शेअर करत उमेशने त्यावर हार्ट इमोजी देत आपल्या बायकोचं कौतुक केलं आहे. याबरोबरच, हर्षदा खानविलकर, पर्ण पेठे या कलाकारांनीदेखील कमेंट करत अभिनेत्रीचे कौतुक केले आहे. तसेच चाहत्यांनी हार्ट इमोजी शेअर करत प्रेम व्यक्त केले आहे.

दरम्यान, प्रिया बापट सोशल मीडियावर सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. ती तिचे विविध फोटो पोस्ट करित असते. अनेकदा अभिनेता व तिचा पती उमेश कामतबरोबर ती फोटो पोस्ट करते. चाहते तिच्या सोशल मीडियावरील पोस्टना पसंती देत असल्याचे पाहायला मिळते.

# खेर रमा-अक्षय एकत्र येणार! रेवाचा खोटेपणा होणार उघड

रमा व अक्षयची जोडी ही प्रेक्षकांची लाडकी आहे. 'मुरांबा' मालिकेतील या जोडीने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. लोकप्रिय असणाऱ्या मालिकांपैकी एक अशी या मालिकेची ओळख आहे. आता या मालिकेत मोठा ट्विस्ट येणार आहे. रेवाचे सत्य सर्वांसमोर येणार असल्याचे समोर आलेल्या प्रोमोमध्ये पाहायला मिळत आहे.



स्टार प्रवाह वाहिनीने इन्स्टाग्रामवर 'मुरांबा' मालिकेचा प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोच्या सुरुवातीला पाहायला मिळते की, रेवाने रमाला एका खोलीत बांधून ठेवले आहे. तिच्या हातात एक बंदूक आहे. ती बंदूक रेवा रमाच्या डोक्याला लावते आणि म्हणते, "गुड बाय रमा. शेवटी माणुसकी हरते आणि मनी पॉवर जिंकते. तितक्यात पोलिसांचा आवाज येतो. ते तिला म्हणतात, "रेवा, तुला चारही बाजूंनी घेरलंय. स्वत:ला पोलिसांच्या हवाली कर. ते ऐकल्यानंतर रेवाचं मन विचलित होतं. ती विचार करत असते आणि तेवढ्यात रमा संधीचा फायदा घेते. ती रेवाचं लक्ष नसल्याचं पाहत स्वत:ची सुटका करून घेते. रेवाच्या हातातील बंदूक स्वत:च्या हाती घेऊन, तिच्याच डोक्याला लावते. रेवाला म्हणते, "संपला तुझा खेळ." मग रमा रेवाला धरून, त्या घराबाहेर आणते. बाहेर अक्षय, अभिषेक व कुटुंबातील इतर लोक, तसेच पोलिसही उपस्थित असतात. पोलिस रेवाला नेतात, त्यावेळी ती "सोडा मला", असे म्हणताना दिसत आहे. रमा अक्षयचा हात हातात घेत म्हणते, "ही रमा-अक्षयच्या प्रेमाची ताकद आहे; ज्यात विजय सत्याचाच झाला." तिच्या या बोलण्याला अक्षय हसून प्रतिसाद देताना दिसत आहे.

हा प्रोमो पाहिल्यानंतर प्रेक्षक खूश झाल्याचे पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका नेटकऱ्याने म्हटले, "वाह! मस्तच अक्षय-रमा." दुसऱ्या नेटकऱ्याने म्हटले, "रमा-अक्षयचे प्रेम जिंकले. खूप छान झाले. पण, शशिकांत मुकादमलासुद्धा शिक्षा झाली पाहिजे. म्हणजेच पूर्णपणे न्याय मिळाला, असे वाटेल.

# 'परदेसी गर्ल' इरिना रुडाकोवा शिकतेय मराठमोळी लावणी

'बिग बॉस' मराठीच्या पाचव्या पर्वातील सर्वच कलाकार अजूनही चर्चेत आहेत. घरातून बाहेर आल्यानंतर अनेक जण आपापल्या कामांमध्ये व्यग्र झालेत. मात्र, तरीही चाहत्यांसाठी ते सोशल मीडियावर काही ना काही पोस्ट करीत असतात. अशात आता बिग बॉसच्या घरात झळकलेली 'परदेसी गर्ल' इरिना रुडाकोवा नुकतीच चर्चेत आली आहे. तिनं सोशल मीडियावर लावणी शिकतानाचा एक व्हिडीओ पोस्ट केला आहे.

'बिग बॉस' फेम इरिना रुडाकोवाला भारतीय संस्कृती फार आवडते. ती अनेकदा मराठमोळ्या लूकमध्ये सजलेली दिसली आहे. इरिनाला मराठी बोलता येत नाही; मात्र तिला सर्व मराठी समजतं. यंदा इरिनानं महाराष्ट्रातील गणेशोत्सव, दिवाळी असे सर्वच सण मोठ्या उत्साहात साजरे केलेत. तिला मराठी संस्कृती अधिक चांगल्या रीतीनं जाणून घ्यावीशी वाटते. त्यासाठी ती नेहमी काही ना काही शिकण्याचा प्रयत्न करते.



गोव्यात पार पडणाऱ्या इफ्फी 'आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४' मध्ये इरिनाने हजेरी लावली आहे. येथेच तिने लावणीतील काही स्टेप्स शिकून घेतल्या आहेत. याचा व्हिडीओदेखील तिने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर पोस्ट केला आहे. या व्हिडीओमध्ये ती लावणी कलाकारांसह काही स्टेप्स शिकताना दिसत आहे. व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, इरिना दिवंगत प्रसिद्ध गायिका सुलोचना चव्हाण यांच्या 'खेळताना रंग बाई होळीचा' या लावणीवर डान्स करत आहे. तिच्या आजुबाजूला काही लावणी सादर करणाऱ्या कलाकार आहेत. त्यांनी इरिनाला सुंदर स्टेप्स शिकवल्यात.

इरिनाचा हा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर चाहत्यांनी सुंदर कमेंट्स केल्यात आणि लाइक्सचाही वर्षाव केला आहे. एका चाहत्यानं तर तिला कमेंटमध्ये म्हटलंय, "असं वाटतं तू महाराष्ट्रातील एका मुलाशी लग्न केलं आहेस." तर आणखी एकानं "महाराष्ट्राची सुंदरी इरिना दी", असं लिहिलं आहे. 'बिग बॉस'च्या घरात असताना इरिनाचं नाव वैभव चव्हाणबरोबर जोडलं जात होतं. या दोघांची ऑन स्क्रीन केमिस्ट्री चाहत्यांनाही फार आवडली. त्यानंतर शोमधून बाहेर आल्यावर इरिना आणि वैभवचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्या व्हिडीओमध्येदेखील तिनं नारिंगी रंगाची नऊवारी साडी नेसली होती. तसेच तिनं वैभवबरोबर एका गाण्यावर रील व्हिडीओ बनवला होता. त्यांच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी दोघांनाही लग्न करा, असा सल्ला दिला होता.

# 'ठरलं तर मग' फेम जुई गडकरीला नेटकऱ्याने विचारलं 'वय किती?

'ठरलं तर मग' मालिकेमुळे अभिनेत्री जुई गडकरी घराघरांत लोकप्रिय झाली आहे. या मालिकेमुळे तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात वाढला. जुईच्या आयुष्यातील प्रत्येक गोष्ट जाणून घेण्यात तिच्या चाहत्यांना रस असतो. नुकतंच अभिनेत्रीने सोशल मीडियावर 'आस्क मी सेशन' घेतलं यावेळी तिने वैयक्तिक आयुष्यातील अनेक गोष्टींची दिलखुलासपणे उत्तरं दिली.

जुईला सुरुवातीला तिच्या चाहत्याने, "ताई तुला चित्रपटासाठी विचारणा होते का? आणि होत असेल तर स्वीकारत का नाहीस?" असा प्रश्न विचारला. यावर अभिनेत्री म्हणाली, "विचारणा होते! पण, मला हवं तसं काम मिळत नाही. म्हणून चांगल्या कामाची वाट बघत आहे." अभिनेत्रीला तिच्या आणखी एका चाहत्याने वयाबद्दल प्रश्न विचारला. जुई गेली अनेक वर्षे इंडस्ट्रीमध्ये काम करत आहे. मध्यंतरी आजारपणाच्या काळात तिने स्वत:साठी वेळ घेतला होता. पण, यानंतरही आरोग्य जपून तिने पुन्हा एकदा कामावर फिट होऊन परतली आहे. अनेकांना जुईचं वय तिशीच्या आत असल्याचं वाटतं पण, प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री आता ३६ वर्षांची असून तिला आता ३७ वं वर्ष चालू असल्याचं तिने चाहत्याला दिलेल्या उत्तरात सांगितलं आहे.



# तुला शिकवीन चांगलाच धडा' चारुहास आणि चारुलताच्या लग्नात अक्षराचा गोंधळ!



'तुला शिकवीन चांगलाच धडा' मालिकेत भुवनेश्वरीच सत्य सर्वांसमोर आणण्यासाठी अक्षराची कसरत चालू आहे. भुवनेश्वरी परत आलीये या मतावर अक्षरा ठाम आहे. भुवनेश्वरी-चारुलता या भोवऱ्यात अक्षरा पूर्णपणे अडकली आहे. चारुलताच्या म्हणण्यावरुन घरातल्या सगळ्यांनाच यावर विश्वास बसू लागतो की, अक्षराला मानसिक उपचारांची गरज आहे.

अक्षरावर घरी कुणीच विश्वास ठेवायला तयार नाहीये. पण अक्षरा वारंवार भुवनेश्वरीला म्हणजेच चारुलताला आता थेट वॉर्निंग देऊ लागलेय की ती हे सिद्ध करुन दाखवणार की चारुलता म्हणजेच भुवनेश्वरी आहे. अक्षरा अधिपतीकडे हट्ट करते की बाबा आणि चारुलताचं लग्न थांबवलं पाहिजे. पण दुसरीकडे चारुलता चारुहासला सांगते की, अक्षराची तब्येत बघता लग्नाचा मुहूर्त अलिकडचाच घेतला पाहिजे.

# ऐश्वर्या नारकर यांच्या सौंदर्याचं आणि फिटनेसचं रहस्य काय?



मनोरंजन विश्वातील सर्वच कलाकार त्यांच्या सौंदर्यासह फिटनेसची विशेष काळजी घेतात. त्यांच्याप्रमाणे आपणही फिट असावं, असं अनेक चाहत्यांना वाटतं. ९० च्या दशकातील अनेक मराठमोळे कलाकार आजही निरोगी आरोग्यासाठी दररोज व्यायाम करतात. त्यातीलच एक मराठमोळी अभिनेत्री ऐश्वर्या नारकर. त्या सध्या 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या मालिकेत काम करत आहेत. ऐश्वर्या ४९ वर्षांच्या आहेत. मात्र, आजही त्यांचं सौंदर्य भल्या भल्या नवख्या आणि तरुण अभिनेत्रींना लाजवतं.

ऐश्वर्या नारकर इतक्या फिट आणि सुंदर कशा दिसतात, असा प्रश्न तुमच्याही मनात आलाच असेल. त्याच्याच शंकानिरसनासाठी आपल्या चाहत्यांना त्यांनी याची माहिती दिली आहे. अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी त्यांच्या फिटनेसचं रहस्य सांगणारा एक व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला आहे.

शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये त्या व्यायाम करताना दिसत आहेत. व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, त्या मॅटवर उभ्या असून, आपले केस बांधत आहेत. तसेच सुरुवातीच्या काही स्टेप्स करत आहेत. व्यायाम करताना आपल्या शरीरात जास्तीत जास्त पाणी असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्या या व्हिडीओत पाणी पितानाही दिसत आहेत. व्यायामाचा हा अगदी छोटा व्हिडीओ ऐश्वर्या यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्ट केला आहे.

व्हिडीओ पोस्ट करीत त्याला त्यांनी कॅप्शनही दिली आहे. त्यामध्ये त्यांनी "व्यायाम करणे कधीच थांबवू नका", असं लिहिलं आहे. ऐश्वर्या यांनी शेअर केलेल्या व्हिडीओवर त्या रोज काय व्यायाम करतात याचीही माहिती सांगितली आहे.

# कारण शरद व हेमंत ऋतूंचा संधिकाळ आरोग्यास बाधकच!

शरदातला (ऑक्टोबर हिटचा) उष्मा कमी होऊन हळुहळू थंडीचा सुगावा लागू लागला की, समजावं की हेमंत ऋतू सुरू होत आहे. प्रत्यक्ष थंडी सुरू होण्याआधी काही लक्षणांवरुन थंडीचे आगमन ओळखता येते. त्यातले महत्त्वाचे लक्षण म्हणजे त्वचेचा कोरडेपणा. तुमच्या शरीराची त्वचा कोरडी पडू लागली की, समजावे लवकरच थंडी येणार आहे. त्यातही या दिवसांत पायांची त्वचा अधिक कोरडी पडते. हा शरद ऋतू आणि हेमंत ऋतू यांचा संधिकाळ आहे, म्हणजे ऑक्टोबर हिटचा उष्मा संपतानाचा आणि डिसेंबरची थंडी सुरू होतानाचा संगमकाळ. त्याबद्दल या लेखात जाणून घेऊ!





शरद आणि हेमंत या ऋतूंच्या संधिकाळाला आयुर्वेदाने नितांत महत्त्व दिलेले आहे, त्याला 'यमदंष्ट्रा' म्हटले आहे. कोणत्याही दोन ऋतूंचा संधिकाळ हा आरोग्यासाठी हितकर नसतोच, तसाच तो या शरद व हेमंत या उभय ऋतूंचा सुद्धा नाही. मात्र या ऋतू संधिकाळाला आपल्या आरोग्य-परंपरेने यमदंष्ट्रा संबोधून त्याचे गांभीर्य आपल्याला सांगितले आहे.

या सूत्राचा अर्थ होतो यमदंष्ट्रा काळ हा वैद्य-डॉक्टरांसाठी बहिणीसारखा आहे. यमदंष्ट्रा म्हणजे नेमका कोणता काळ?तर, कार्तिक महिन्याचे शेवटचे आठ दिवस आणि मार्गशीर्ष महिन्याचे पहिले आठ दिवस. या संधिकाळाला (या पंधरवड्याला) 'यमदंष्ट्रा' म्हणतात आणि हा पंधरवड्याचा काळ वैद्य व डॉक्टरमंडळीं साठी बहिणीसारखा आहे, असे आपली परंपरा म्हणते. का, तर या काळामध्ये आजार खूप वाढतात आणि रुग्णसंख्या वाढून वैद्यांचा व्यवसाय जोरात चालू लागतो, म्हणून बहीण जशी भावाची काळजी घेते, तसा मुबलक रुग्ण पुरवून वैद्यांची, त्यांच्या व्यवसायाची-चरितार्थाची काळजी घेणारा असा हा काळ आहे. शरद आणि हेमंत हे उभय ऋतू हे विसर्गकाळातले म्हणजे शरीराचे बल वाढवणाऱ्या काळातले असले, तरी शरद हा उष्ण ऋतु आहे, तर हेमंत हा शीत. शरदात असतो ऑक्टोबरचा उष्मा, तर हेमंतात असतो हिवाळ्यातला थंडावा. साहजिकच या दोन ऋतूंचा संधिकाळ म्हणजे उष्मा आणि थंडाव्याचा संधिकाळ, जेव्हा उष्म्याकडून थंडाव्याकडे प्रवास होतो, जो रोगकारक होण्याची शक्यता दाट असते. वातावरणात, सभोवतालच्या तापमानात झालेला बदल शरीराला उपकारक होत नाहीच, कारण त्याआधीच्या वातावरणाशी- तापमानाशी शरीराने जुळवून घेतलेले असते. नवीन वातावरणाशी-तापमानाशी जुळवणे ज्या शरीरांना जमत नाही, झेपत नाही ती शरीरं आजारांना बळी पडतात. वातावरणातला बदल हळुहळू झाला, तर तो शरीराला काही प्रमाणात तरी सात्म्य (अनुकूल) होऊ शकतो, मात्र तसे न होता एक- दोन दिवसांत अचानक बदल झाला आणि उन्हाळा थांबून अकस्मात थंडावा सुरु झाला तर ते शरीराला उपकारक होत नाही.

## राशी भविष्य





▶▶ मेष – मानसिक चांचल्य जाणवेल. आवेगाला आवर घालावी लागेल. गृहोपयोगी वस्तूंची खरेदी कराल. आपली मैत्री घट्ट होईल.

▶▶ वृषभ – वरिष्ठांना खूश कराल. वादविवाद वाढवू नका. स्पर्धा जिंकाल. कष्टाला मागे पुढे पाहू नका. खर्चाचे योग्य नियोजन करावे.

▶▶ मिथुन – आपल्या नावलौकिकात भर पडणारी घटना घडेल. प्रेमाच्या दृष्टीने चौकसपणा दाखवाल. मानापमानात अडकून पडू नका.

▶▶ कर्क – नोकरीत तुमच्यावर मोठी जबाबदारी दिली जाईल. आपल्या सहकाऱ्यांशी जुळवून घ्यावे लागेल. सामाजिक प्रतिष्ठा लाभेल.

▶▶ सिंह – काही अनपेक्षित बदल दिसून येतील. कामाचे योग्य नियोजन करावे लागेल. आत्मविश्वास वाढेल. नवीन ओळखी होतील.

▶▶ कन्या – आपल्या मनमोकळ्या स्वभावाचे दर्शन घडवाल. मनातील नसती भीती दूर सारावी. नवीन गोष्टी आवडीने जाणून घ्याल.

▶▶ तूळ – आपल्या कल्पनाशक्तीला चालना मिळेल. विरोधकांच्या कारवाया वाढू शकतात. आपला दर्जा टिकवण्याचा प्रयत्न कराल.

▶▶ वृश्चिक – वागण्या-बोलण्यात सज्जनपणा ठेवाल. गैरसमजातून वाद वाढू देऊ नका. कामात आपली छाप पाडण्यात यशस्वी व्हाल.

▶▶ धनु – कार्यक्षेत्रात प्रगतीचा नवा टप्पा गाठता येईल. कामात वारंवार बदल करू नका. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्यावी.

▶▶ मकर – कौटुंबिक शांतता जपावी. तुमच्या संपर्कातील लोकांमध्ये भर पडेल. आपले मैत्रीचे संबंध जपाल. वाहन जपून चालवा.

▶▶ कुंभ – घरातील लोकांच्या अपेक्षा आपणास पूर्ण करता येतील. विचारांना चालना मिळेल. धंद्यात क्षुल्लक अडचण येऊ शकते.

▶▶ मीन – प्रेमाने बोलून समस्या सोडवाल. मित्र मंडळींशी सलोखा ठेवावा लागेल. खर्च वाढू शकतो. आर्थिक व्यवहार सावधपणे करावेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये दर वर्षी तीन हजार झाडांवर कुऱ्हाड?

**पिंपरी (अभिजित येरल्लू) :** महापालिकेकडून दर वर्षी किमान एक लाख वृक्षारोपण केले जात असले, तरी दर वर्षी महापालिकेकडूनच सुमारे तीन हजारांपेक्षा अधिक झाडे तोडण्यास परवानगी देण्यात येते. शिवाय विनापरवाना झाडांवर कुऱ्हाड घालण्यात येत असल्याने शहरातील झाडांची संख्या घटत असल्याचे निदर्शनास आले आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात उद्यान विभागाच्या वतीने वृक्षारोपण केले जाते. मात्र, वृक्ष तोडण्याचे प्रमाण कमी होत नसल्याचे दिसत आहे. वृक्षारोपण केलेल्या रोपांची योग्य काळजी घेत नसल्याने अनेक रोपे जळून जात आहेत. विकासकामाच्या नावाखाली शहरातील झाडांवर मोठ्या प्रमाणावर कुऱ्हाड चालविण्यात येत आहे. रस्त्याचे रुंदीकरण, पदपथावरील खोदकाम, भूमिगत सेवावाहिन्या, बांधकामे आणि इतर विकासकामांसाठी झाडे तोडली जात आहेत. तर, झाडांच्या फांद्यांमुळे जाहिरात फलक दिसत नसल्याने, दुकान किंवा कार्यालयास अडथळा, पानांचा कचरा होत असल्याने झाडे तोडली जातात. मेट्रोच्या कामास अडथळा होत असल्यानेही पिंपरी ते निगडी मार्गावरील झाडे तोडली आहेत. विनापरवाना झाडे तोडण्याच्या प्रमाणतही वाढ झाली आहे.

उद्यान विभागाकडून खासगी जागेतील एक झाड तोडण्यासाठी केवळ दहा हजार रुपये शुल्क आकारले जाते. त्यामुळे शहरात बेसुमार वृक्षतोड होत आहे. अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्यास महापालिकेच्या उद्यान विभागाला अपयश आल्याचे दिसून येत आहे. उद्यान विभागाच्या वतीने या वर्षी दोन लाख वृक्षारोपणाचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत एक लाख ६० हजार रोपांची लागवड करण्यात आली आहे. देहूरोड कटक मंडळ, दिघी व औंधच्या संरक्षण विभागाच्या हद्दीत लागवड करण्यात आली आहे. आणखी ४० हजार रोपे मोकळी जागा, रस्त्यांच्या कडेला लावण्यात येणार आहेत. बांबूची २५ हजार २६० झाडे लावण्यात आली आहेत.

# हिवाळी शिबिराचा चुमकल्यांनी घेतला मनमुराद आनंद

**कल्याण (आकाश कांबळे) :** सुट्टी म्हंटल की मुलांचा आनंदाचा दिवस, मुलांना सुट्टया लागल्यानंतर वेगवेळे खेळ खेळणे, पोहणे, मित्रांसोबत गप्पा मारणे खोड्या करणे असा हा दिवस. मात्र आताच्या मोबाईल युगात मुलांना या सर्व गोष्टींचा विसर पडत चालला आहे. हिच बाब लक्षात घेऊन 'सिम्बॉल ऑफ नॉलेज एज्युकेशन असोसिशन' या संस्थेचे सचिव गणेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून मुलांसाठी तीन दिवसांचे 'व्हेकेशन कॅम्पचे' आयोजन केले होते. यामध्ये मुलांच्या आवडीचे खेळ समाविष्ट केले असून 'खेळ खेळूनी सतेज व्हावे' या उक्ती प्रमाणे या शिबिरामध्ये कराटे, बॉक्सिंग, योगा, स्केटिंग, स्विमिंग, माईंड गेम, फन गेम अशा विविध खेळांचे समाविष्ट करण्यात आले होते.

या शिबिराची सुरवात किंडर जॉय प्रि - स्कूल, येथील प्रांगणात करण्यात आली. त्या वेळेस या शाळेच्या मुख्यध्यापिका. पौर्णिमा गायकवाड यांनी शिबिराची संपूर्ण माहिती देत सर्वांचे स्वागत केले. या शिबिरामध्ये जवळपास पन्नासहुन अधिक विध्यार्थींनी



सहभाग घेतला असून शेवटच्या दिवशी सर्व पालक देखील या शिबिरात सहभागी झाले. या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे शिबिराची प्रत्येक ऍक्टिव्हिटी ही तज्ञ प्रशिक्षकांच्या माध्यमातून पूर्ण करून घेतली गेली असे पालकांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले. या शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थांना डॉ. हराळे, ऍड. विजय लोंढे, सखाराम बीज (एच. डी.एफ.सी बँक ऑफिसर), उद्योगपती सिंग, प्राध्यापक शामराव भोईर, सामाजिक कार्यकर्ते संजय लोंढे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि बक्षिसांचे वितरण कारण्यात आले.

**SPORT**

# Bajrang Punia banned for four years, can't wrestle or seek coaching opportunities abroad: Complete timeline of events

**New Delhi -** Bajrang Punia, India's Tokyo Olympics bronze medal-winning wrestler, was suspended by the National Anti-Doping Agency (NADA) for four years for refusing to submit a sample for a doping test on March 10 during the national team selection trials. This decision came after NADA had initially suspended Bajrang Punia on April 23 for the same offence, which led to a subsequent suspension by the World Governing Body, UWW.

This suspension means that he will not be allowed to participate in competitive wrestling nor seek coaching opportunities overseas, should he wish to do so.

Bajrang contested the initial provisional suspension, and on May 31, NADA's Anti-Disciplinary Doping Panel (ADDP) lifted the suspension temporarily until a formal notice of charges was issued. On June 23, NADA formally notified him of the charges.

In response to this, Bajrang, who had aligned himself with the Congress party alongside fellow wrestler Vinesh Phogat and assumed leadership of the All India Kisan Congress, filed a challenge against the charges on July 11. Following this, hearings took place on September 20 and October 4.

The ADDP concluded that Bajrang was accountable for sanctions under Article 10.3.1, resulting in a four-year ban on his eligibility.



"The Panel holds that the Athlete is liable for sanctions under Article 10.3.1 and liable for ineligibility for a period of 4 years," the ADDP said in its order.

"In the present case, since the Athlete had been provisionally suspended, the Panel accordingly holds that the Athlete's period of his ineligibility for the period of 4 years shall commence from the date on which the notification was sent, i.e., 23.04.2024.

"Needless to say that on account of the lifting of the provisional suspension for the period from 31.05.2024 to 21.06.2024 shall not be credited into the total period of ineligibility of four years."

Bajrang has consistently claimed that he was subjected to unfair treatment regarding doping control due to his involvement in protests against the former Wrestling Federation of India President, Brij Bhushan Sharan Singh. He insisted that he never outright refused to provide a sample but rather sought clarification from NADA regarding his concerns over the use of expired testing kits that were sent for his samples in December 2023.

NADA defended its actions, affirming that the Chaperone/Doping Control Officer (DCO) had properly approached him, explaining the requirement to provide a urine sample for analysis. In his written defense, Bajrang expressed that NADA's previous conduct had led to mistrust, claiming that the organization's lack of acknowledgment or response in past incidents eroded his confidence in the doping control process. He felt a sense of moral obligation to address these concerns as a prominent athlete in the sports community.

Bajrang stated that he was always willing to provide a sample, contingent upon receiving adequate responses from NADA regarding the expired kits. However, NADA maintained that his refusal to cooperate was both intentional and deliberate, asserting that he has shown a blatant disregard for his responsibilities as outlined in Articles 20.1 and 20.2 of the Anti-Doping Rules, 2021.

# Virat Kohli's last Australia tour confirmed as team India lands in Adelaide

**New Delhi -** Legendary cricketer Sunil Gavaskar heaped praise on Virat Kohli following his 30th Test century during the Perth Test in the Border-Gavaskar Trophy 2024-25. Sunil Gavaskar stated that this might be Virat Kohli's final tour of Australia and predicted more centuries from him in the remaining matches.

Virat Kohli entered the series after a poor home Test performance against New Zealand, where he averaged below 16 in three Test matches. However, Virat Kohli made a stunning comeback in the first match of the Australia series. He scored an unbeaten century off 143 balls in India's 295-run victory.

In a conversation with Sports Tak, Sunil Gavaskar said that Virat Kohli's



century boosts the team's confidence for the next four matches. Gavaskar said that Virat Kohli can score more centuries in the remaining four Test matches.

"Yes, of course. Because when your most experienced and best player gets back in form in the first match, the team's confidence increases for the next four matches," Gavaskar told Sports Tak.

"The team knows that even though we lost two or three wickets, our strong player is ready. They are in form. And they... Because this could be their last tour of Australia. So he can score more centuries. There are four test matches. He can definitely make more centuries," he added.

The former Indian skipper scored just five runs in the first innings. However, he silenced the critics with the century in the second innings. KL Rahul and Yashasvi Jaiswal added a 201-run opening partnership at the Optus Stadium. Jasprit Bumrah won the "Player of the Match" for his bowling performance.



## Mirabai Chanu To Skip Weightlifting World Championships To Continue Rehab

**New Delhi -** Tokyo Olympic silver medallist Mirabai Chanu will miss next week's weightlifting World Championships in Manama, Bahrain as she continues to undergo rehabilitation.

The 30-year-old former world champion has not competed since her fourth-place finish in the women's 49kg category at the Paris Olympics in August.

"Mira is still in rehab after the Paris Olympics. She will not be taking part in this World Championship," chief national coach Vijay Sharma told PTI.

Chanu had been in a race against time to recover for the Paris Games after she suffered a hip injury at the Asian Games last year. There were murmurs surrounding her fitness even as she competed at the Olympics.

Her dream to win an Asian Games medal — the only medal missing from her overflowing trophy cabinet — was dashed last year but the Manipuri, despite all the injuries, is determined to stand on the podium at the continental event. "It is important for her to recover well as we will need to begin preparation for the 2026 Commonwealth Games and Asian Games," Sharma added. In Chanu's absence, Commonwealth Championship gold medallist Gyaneshwari Yadav will spearhead the Indian challenge at the World Championships, beginning on December 6. The 21-year-old will represent India in the 49kh weight class.



# Rishabh Pant's retirement plan chalked out by LSG owner Sanjiv Goenka

**New Delhi -** Lucknow Super Giants (LSG) have not only made a bold statement by securing Rishabh Pant for a record-breaking INR 27 crore at the IPL 2025 mega auction, but they've also outlined a long-term vision for the Indian wicketkeeper's future with the franchise.

Sanjiv Goenka, the Lucknow Super Giants (LSG) owner, has expressed a clear intent to have Rishabh Pant for the next decade or more. Pant's resilience and determination, demonstrated by his incredible comeback from a life-threatening accident to reclaim his place in the Indian cricket team, has inspired Goenka and the LSG management to break the bank for him.

At just 27 years old, the explosive left-handed batter represents not just a short-term asset but a player capable of shaping the franchise's legacy in the Indian Premier League (IPL), according to the Lucknow Super Giants (LSG) owner Sanjiv Goenka.

Well, it was not just a high-profile buy, but it's a strategic investment in a player whose fearless approach and leadership qualities have already earned him recognition worldwide. Goenka said that Lucknow Super Giants (LSG) wants Rishabh Pant to finish his IPL career with the franchise.Sanjiv Goenka was quoted as saying by Times Now: "He (Rishabh Pant) had a fatal accident. Yes. He came out of it and has gone back to form, playing for the country, and now that kind of never-say-die attitude, I think that is something that's not easy to get, and he's only 27. So hopefully he'll be with us till the time he's 37, 38, 39, or 40."

Notably, Pant has rewritten IPL history by becoming the most expensive player after being snapped up by LSG for an astonishing INR 27 crore at the IPL 2025 mega auction.

This record-breaking price has set a new benchmark in the tournament's history. The bidding war was a spectacle, with LSG and Delhi Capitals (DC) fiercely competing to acquire Pant's services in Jeddah.

Even Delhi Capitals (DC) used their Right to Match (RTM) card when LSG's bid reached INR 20.75 crore. However, Goenka wasn't ready to back down, raising the stakes by an additional INR 6.25 crore to secure the dynamic wicketkeeper-batter for a mouthwatering INR 27 crore.

Speaking about this blockbuster move, the LSG owner was quoted as saying by Cricbuzz: "This was not about one individual player. It was not about egos. Did we want to have the most expensive player? No. At the end of the day, this does not mean very much to the franchise."

# हरित क्रांतीतील स्वामिनाथन यांच्याप्रमाणेच जैवइंधन क्रांतीत प्रमोद चौधरींचे मोठे योगदान! - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी



● पुणे, अभिजित येरल्लू :

जैवइंधनातील प्रगतीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. यातून गावे सशक्त होणार असून, ग्रामीण भागातून शहरात स्थलांतर करण्याचे प्रमाण कमी होईल. देशात हरित क्रांतीत एम.एस.स्वामिनाथन यांचे योगदान मोठे होते. आता कृषी क्षेत्रात जैवइंधन क्रांती सुरू असून, त्यात डॉ. प्रमोद चौधरी यांनी मोठे योगदान दिले आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मंगळवारी काढले.

प्राज इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांच्या पंचाहत्तरीनिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमात गडकरी यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून भाषण केले. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, फोर्स मोटर्सचे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदिया, पर्सिस्टंट सिस्टिम्सचे संस्थापक डॉ. आनंद देशपांडे, प्राजचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशीपुरा आणि अध्यक्ष अतुल मुळे आदी उपस्थित होते.

गडकरी म्हणाले की, जैवइंधनाच्या माध्यमातून मोठे सामाजिक-आर्थिक स्थित्यंतर होणार आहे. जैवइंधन विकसित करण्यात प्रमोद चौधरी यांच्या संशोधनाचा मोलाचा वाटा आहे. जैवइंधनाचा कृषी अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होणार आहे. इथेनॉल निर्मितीमुळे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने आपण वाटचाल करणार आहोत. भविष्यात खनिज तेलाची आयात कमी करून आपण आत्मनिर्भर बनण्यात यशस्वी होऊ. आगामी काळात चौधरी यांनी जैवइंधन क्षेत्रात असेच सकारात्मकरीत्या कार्यरत राहावे आणि देशाला मार्गदर्शन करावे.

## ११ कोटींच्या सायबर फसवणुकीप्रकरणी एकाला अटक

● मुंबई, राकेश गायकवाड :

शेअर बाजारातील गुंतवणुकीतून चांगला परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ७५ वर्षीय निवृत्त व्यक्तीची ११ कोटी रुपयांची सायबर फसवणूक केल्याप्रकरणी ३२ वर्षीय आरोपीला पोलिसांनी अटक केली. गुन्ह्यातील ४४ लाख रुपये आरोपींकडे डेबिटकार्ड असलेल्या बँक खात्यात जमा झाल्याचे निष्पन्न झाले होते. आरोपीकडून ३३ डेबिटकार्ड व १२ चेकबुक जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी दक्षिण प्रादेशिक सायबर पोलीस तपास करत आहेत. यावर्षी ऑगस्ट महिन्यात त्यांना अनया स्मिथ नावाच्या महिलेने एका व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये सामील करून घेतले होते. त्यांनी देशातील मोठ्या ब्रोकिंग कंपनीच्या नावाने हा ग्रुप तयार केला होता. या कंपनीमार्फत गुंतवणूक केल्यास तुम्हाला मोठा फायदा होईल, असे आमिष तक्रारदाराला दाखवण्यात आले. त्यावर विश्वास ठेऊन त्यांनी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. महिलेच्या सांगण्यावरून तक्रारदाराने २२ व्यवहारांद्वारे ११ कोटी १६ लाख ६१ हजार रुपये विविध खात्यात जमा केले होते. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर रक्कम जमा झालेल्या एका बँक खात्यातून ६ लाख रुपये एका महिलेने काढल्याचे निष्पन्न झाले.

## वैमानिक तरूणीची मुंबईत आत्महत्या, पवई पोलिसांनी केली मित्राला अटक



● मुंबई, विशाल कारंडे :

दिल्लीतील रहिवासी असलेल्या २५ वर्षीय वैमानिक तरूणीच्या आत्महत्या प्रकरणी पवई पोलिसांनी २७ वर्षीय मित्राला अटक केली आहे. अंधेरीमधील मरोळ येथील राहत्या घरात सृष्टी विशाल तुली (२५) या तरूणीने आत्महत्या केली होती. आरोपीने मृत तरूणीचा मानसिक छळ केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, मृत तरूणीच्या कुटुंबियांनी तिची हत्या करून ती आत्महत्या दाखवण्याचा प्रयत्न केल्याचा संशय व्यक्त केला आहे. याप्रकरणी पोलीस सर्व बाजूंनी तपास करीत असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

अंधेरी (पूर्व) येथील मरोळ पोलीस कॅम्पमागील कानाकिया रेन फॉरेस्ट येथील भाड्याच्या घरात राहणाऱ्या या तरुणीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

### कुटुंबीयांचे आरोप

तुलीच्या कुटुंबीयांनी केलेल्या तक्रारीनुसार, पंडित तिच्यासोबत सर्वांसोबत भांडण करायचा. त्यामुळे ती मानसिक तणावाखाली होती. तसेच तिच्या खाजगी आयुष्यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करीत होता. तसेच तो तिच्यावर मानसिक दबाव आणत होता. पंडितने तुलीला औषध देऊन मारले असावे आणि नंतर आत्महत्येचा बनाव केला असावा, असा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी पवई पोलिसांनी पंडीतला अटक केली असून त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी तुलीचे काका विवेककुमार यांच्या तक्रारीवरून पवई पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०८ अंतर्गत आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## तुळजाभवानी देवीच्या मंदिर जीर्णोध्दारास प्रारंभ

### पुजारी, भाविकांच्या कामाबाबत सूचनांना प्राधान्य – राणाजगजितसिंह पाटील



● धाराशिव, दिगंबर जाधव:

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तिर्थक्षेत्राचा संपूर्ण कायापालट करण्यासाठी दोन हजार कोटींचा आराखडा अंतिम करण्यात आला आहे. हा विकास आराखडा उच्चाधिकार समितीकडे सादर करण्यात आला आहे. लवकरच त्यास मान्यता मिळेल आणि प्रत्यक्ष कामास सुरवात होईल. दरम्यान मंदिर समितीच्या स्वनिधीतून ६० कोटी रुपयांची कामे हाती घेतली आहेत. यातून तुळजाभवानी देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येणार आहे. पुजारी वर्ग आणि भाविकांच्या या कामाबाबतच्या सूचनांचा अंतर्भाव करण्यासाठी गुरुवारी बैठकीचे आयोजनही करण्यात आले आहे. त्यानुसार जीर्णोद्धाराचे काम पूर्ण केले जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

तुळजाभवानी मंदिर समितीच्या स्वनिधीमधून मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले आहे. पुरातत्व खात्याच्या निगराणीखाली कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिराच्या सभामंडपचा काही भाग पूर्ण उकलून पुन्हा नव्याने मजबूत केला जाणार आहे. मंदिरासह आसपासचा भागही मोकळा करून घेतला जाणार आहे. त्यासाठी मंदिरातील ओवऱ्या थोड्या मागे घेण्यात येणार आहेत.

### नागरिक, पुजारी, भाविकांनी बैठकीस उपस्थित राहावे

■ वरील सर्व कामांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा मंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. सचिन ओम्बासे यांना सर्व संबंधितांची बैठक घेऊन कामाचा कालबद्ध आराखडा तयार करण्याच्या सूचना काल देण्यात आल्या होत्या. त्या प्रमाणे गुरुवारी नागरिक, पुजारी बांधव आणि भाविकांची त्यानुसार बैठक बोलावण्यात आली आहे. सर्वांच्या सूचनांची आदरपूर्वक दखल घेऊन कामाचे वेळापत्रक निश्चित करण्यात येईल. सर्व माहिती जनतेसमोर मांडण्यात येईल. जेणेकरून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही. त्यामुळे संबंधितांनी गुरुवारी होणाऱ्या बैठकीस आवर्जून उपस्थित रहावे. आपली मते, सूचना नमूद करावयात. त्याचा योग्य विचार करून लवकरात लवकर आई तुळजाभवानी देवीच्या मंदिर जीर्णोद्धाराचे काम पूर्ण केले जाईल असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## दोन लहान मुलांची कुऱ्हाडीने वार करून हत्या केल्यानंतर पत्नीवर हल्ला

● जळगाव , सचिन कदम :




जिल्ह्यात चोपडा तालुक्यातील गौऱ्यापाडा येथे एका तरुणाने चारित्र्याच्या संशयावरून आधी पत्नीवर, नंतर दोघा लहान मुलांवर कुऱ्हाडीने वार केले. या हल्ल्यात दोघा मुलांचा मृत्यू झाला असून, महिला गंभीर जखमी आहे. महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवर जळगाव जिल्ह्यात गौऱ्यापाडा गाव आहे.

या गावात संजय पावरा (२३) हा पत्नी भारती (१९), पाच वर्षांचा मुलगा डेव्हिड आणि तीन वर्षांची मुलगी डिंपल यांच्यासह राहत होता. संजय हा कायम पत्नीशी चारित्र्याच्या संशयावरून वाद घालत असे. १८ नोव्हेंबर रोजी त्यांच्यात या विषयावरुन जोरदार भांडण झाले होते. त्यामुळे त्याची पत्नी दोन्ही मुलांसह मध्य प्रदेशच्या सीमेवरील तिच्या आत्याच्या गावी रांजणगाव येथे निघून गेली होती.

संजयच्या आई-वडिलांनी रांजणगावला जाऊन सुनेशी वाद घातल्यानंतर नातेवाईकांनी तिला माहेरी मध्य प्रदेशातील देवली येथे घेऊन गेले. त्यानंतर संजय पावरा हा देवलीत गेला. यावेळी पत्नीशी झालेल्या भांडणात त्याने कुऱ्हाडीने वार करून दोन्ही मुलांची हत्या केली.

## गुगल मॅप्सनं घेतला तिघांचा जीव

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

उत्तर प्रदेशच्या बरेली जिल्ह्यात लग्नाला जात असलेल्या एका वाहनाचा रविवारी (दि. २४ नोव्हेंबर) अपघात घडला. गुगल मॅप्सवरून दाखविलेल्या रस्त्यावरून वाहन चालविताना मोठा अपघात घडला. याप्रकरणी आता सार्वजनिक बांधकाम विभागातील चार अधिकाऱ्यांविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पोलिसांनी गुगलच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांनाही याप्रकरणी जबाबदार धरले आहे. त्यानंतर गुगलने या प्रकरणी उत्तर दिले आहे.

गुरुग्राममहून उत्तर प्रदेशच्या बरेली जिल्ह्यात लग्नासाठी जात असताना बदायूँ जिल्ह्यातील दातागंज येथे अपघाताची घटना घडली. यावेळी गुगल मॅप्सने दाखविलेल्या रस्त्यावरून जात असताना त्यांनी रामगंगा नदीवरील ब्रिजवरचा रस्ता निवडला. पण



हा ब्रिज अर्धवट असल्याची त्यांना कल्पना नव्हती. वाहन वेगात पुढे गेल्यानंतर ते थेट नदीत कोसळले आणि तिघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला.

यावर्षीच्या सुरुवातीला पुरामुळे नदीतील पुलाचा पुढचा भाग वाहून गेला होता. तेव्हापासून हा पुल अर्धवट अवस्थेत आहे. मात्र गुगल मॅप्सवर त्याबाबतची माहिती अद्यवत झाली नव्हती. आंधळेपणाने गुगल मॅप्सचे अनुकरण केल्यामुळे तीन तरुणांना नाहक जीव गमवावा लागला.

पीटीआयने दिलेल्या बातमीनुसार, पोलिसांनी या प्रकरणी आता सार्वजनिक बांधकाम विभाग आणि गुगलमधील क्षेत्रीय अधिकाऱ्यांची चौकशी सुरू केली आहे. मात्र या अधिकाऱ्याचे नाव त्यांनी जाहीर केले नाही. मृतांमध्ये ३० वर्षीय नितीन कुमार आणि त्याचे चुलत भाऊ अमित कुमार आणि अजीत कुमार यांचा समावेश आहे. हे तिघेही गुरुग्रामवरून निघाले होते, बरेली जिल्ह्यात लग्नासाठी जात असताना वाटेत बदायूँ जिल्ह्यातील रामगंगा नदीवर ही दुर्घटना घडली.

### गुगलने काय उत्तर दिले?

दरम्यान गुगलच्या वतीने या प्रकरणी दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे. गुगलच्या प्रवक्त्यांनी एएफपी वृत्तसंस्थेला पाठविलेल्या ईमेलमध्ये म्हटले की, ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्याप्रती आम्ही संवेदना व्यक्त करतो. आम्ही संबंधित यंत्रणेबरोबर समन्वयातून काम करत आहोत.

## डोंगरीमधील इमारतीला भीषण आग

● मुंबई, यश सावंत :



डोंगरी येथील निशाण पाडा मार्गावरील 'अन्सारी हाईट्स' या १५ मजली इमारतीला बुधवारी दुपारी १ च्या सुमारास भीषण आग लागली. आगीचे वृत्त समजताच अग्निशमन दलाने दुर्घटनास्थळी धाव घेऊन बचावकार्य हाती घेतले आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणीही जखमी झालेले नाही. मात्र आगीची तीव्रता वाढत असून आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. दरम्यान, आगीची तीव्रता वाढल्यामुळे अग्निशमन दलाने दुपारी २.०४ च्या सुमारास श्रेणी ३ ची वर्दी दिली. आगीचे वृत्त समजताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मदतकार्य हाती घेतले. रहिवाशांनीही सुरक्षिततेची बाब लक्षात घेऊन इमारतीबाहेर पळ काढला. आगीची तीव्रता कमी होत नसल्याचे लक्षात येताच अग्निशमन दलाने दुपारी १.१३ वाजता आगीला क्रमांक एकची वर्दी दिली. मात्र आगीची तीव्रता वाढतच आहे. आगीने अक्राळविक्राळ रूप धारण केल्यामुळे अग्निशमन दलाने आगीला क्रमांक ३ ची वर्दी दिली आहे. विविध अद्ययावत यंत्रणांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशामकांकडून प्रयत्न सुरू आहेत.

## वीज देयकाची थकबाकी मागितल्यावर कर्मचाऱ्याला मारहाण, ग्राहकाने...

● नागपूर, दिगंबर जाधव :

ग्राहकाचे वीज देयक थकल्यास महावितरणचे कंत्राटी कर्मचारी वसुलीसाठी जातात. सक्करदरा परिसरात कर्मचारी थकबाकीच्या वसुलीसाठी गेला असता तेथे वेगळा प्रकार घडला. हे प्रकरण आता पोलिसांपर्यंत गेले आहे. महावितरणच्या माहितीनुसार, वीज देयकापोटी असलेली थकबाकी वसुल करण्यास गेलेल्या महावितरणच्या अमोल शेळके या कंत्राटी कर्मचाऱ्याला मारहाण आणि शिवीगाळ केली. या प्रकरणात सक्करदरा पोलिसांकडून ईश्वर धिरडे या ग्राहकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. महावितरणच्या जनसंपर्क विभागाच्या माहितीनुसार,



अमोल शेळके हा २५ नोव्हेंबरला सक्करदरा लेक गार्डन जवळील ईश्वर धिरडे या वीज ग्राहकाच्या घरी वीजदेयकाची वसुली करण्यास गेला होता. कर्मचाऱ्याने आवाज देऊनही संबंधित ग्राहकाने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अमोल शेळके यांनी ग्राहकाकडील विज पुरवठा नियमानुसार खंडित करण्यासाठी मीटरचे टर्मिनल बॉक्स उघडले. यावेळी ईश्वर धिरडे यांनी वीजपुरवठा खंडित करण्यास मज्जाव करताना अमोल यास शिवीगाळ करीत मारहाण केली. त्याचा भ्रमणध्वनी आपटून फोडला, सदर प्रकरणी अमोल शेळके याच्या तक्रारीच्या अनुषंगाने ईश्वर धिरडे या ग्राहकाविरोधात सक्करदरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११५ (२), ३५२ व ३२४ अन्वये दखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात सक्करदरा पोलीस चौकशी करीत आहेत.

राज्यातील ३८ लाख ग्राहकांकडून महावितरणला मूळ देयकाची ५०४८ कोटी, तसेच १७१९ कोटी रुपये व्याज आणि ६९ कोटी ९० लाख रुपये विलंब आकार थकीत आहे. कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित असलेल्या मराठवाड्यातील ग्राहकांकडे सर्वाधिक थकीत रक्कम आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये एकूण १०५४.६५ कोटी रुपये थकले आहेत. विदर्भात सर्वाधिक थकबाकी नागपूर शहर मंडळात २०३.३१ कोटींची आहे. अकोला ७१.९३ कोटी, बुलढाणा ९४.३३, वाशीम ५८.९७, अमरावती ६७.८०, यवतमाळ ८९.१७, चंद्रपूर २६.८२, गडचिरोली २२.३१, भंडारा १२१.२४, गोंदिया १४.७४, नागपूर ग्रामीण ४५.८३, वर्धा १८.९३ कोटी असे एकूण विदर्भातील सहा लाख २९ हजार ९४९ ग्राहकांकडे ८३५.३८ कोटी रुपये थकीत आहेत.

ग्राहकाचे वीज देयक थकले असल्यास महावितरण कर्मचारी आधी संबंधिताला ते भरण्याबाबत सूचना देतात. देयक न भरल्यास संबंधिताला नोटीस दिली जाते. त्यानंतरही देयक न भरल्यास ग्राहकाकडे जाऊन प्रथम ते भरण्याबाबत सूचना करून ते न भरल्यास संबंधिताचा वीज पुरवठा खंडित केला जातो. त्यानंतर ग्राहकाने थकबाकीची रक्कम भरून संबंधित पावती महावितरणच्या कार्यालयात दाखवल्यावर पुन्हा वीज पुरवठा पूर्ववत केला जातो.

## रुग्णालयात आता 'स्मार्ट वॉर्ड'!

### एआय तंत्रज्ञानाच्या आधारे प्रकृती बिघडण्याचा आधीच इशारा

● पुणे, अभिजीत येरल्लू :

आरोग्य व्यवस्थेत कृत्रिम प्रज्ञेचा (एआय) वापर दिवसेंदिवस वाढत आहे. कृत्रिम प्रज्ञाआधारित 'रिमोट मॉनिटरिंग सिस्टिम' (आरएमएस) आणि 'अर्ली वॉर्निंग सिस्टिम'च्या (ईडब्ल्यूएस) साहाय्याने 'स्मार्ट वॉर्ड' उपक्रम रुग्णालयात राबविण्यास सुरवात झाली आहे. यामुळे रुग्णाच्या बिघडणाऱ्या स्थितीची आधीच पूर्वसूचना मिळत असून, त्याद्वारे तातडीने उपचार शक्य होत आहेत. संचेती हॉस्पिटलने पुण्यात सर्वप्रथम हा उपक्रम सुरू केला आहे.

डोझी कंपनीने स्मार्ट वॉर्ड तंत्रज्ञान विकसित केले आहे. याबाबत डोझीचे भारतातील प्रमुख कौशल पांड्या म्हणाले की, रुग्णालयात अतिदक्षता विभागातील रुग्णशय्यांची संख्या अतिशय मर्यादित असते. त्यामुळे प्रकृती गंभीर असलेल्या सर्वच रुग्णांवर अतिदक्षता विभागात उपचार करता येत नाहीत. या परिस्थितीत 'स्मार्ट वॉर्ड' हे तंत्रज्ञान साहाय्यकारी ठरणार आहे. रुग्णालयातील सर्वसाधारण कक्षामध्ये कृत्रिम प्रज्ञाधारित 'बॅलिस्टोकार्डिओग्राफी' (बीसीजी) तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्याद्वारे रुग्णाच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवले जाते. रुग्णाच्या



प्रकृतीत होणाऱ्या बदलांची माहिती डॉक्टर आणि परिचारिकांना तातडीने मिळते. यामुळे रुग्णाच्या प्रकृतीत होणाऱ्या बदलांची पूर्वसूचना मिळून त्यावर वेळेत उपचार करणे शक्य होते.

संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सने अत्याधुनिक सुविधा असलेल्या संचेती ॲडव्हान्स्ड आर्थो केअर हॉस्पिटलची घोषणा केली आहे. या ३०० रुग्णशय्येच्या अद्ययावत वैद्यकीय सुविधेत रुग्ण सुरक्षेसाठी पुण्यातील पहिला 'स्मार्ट वॉर्ड' उपक्रम सुरू केला आहे. याबाबत संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पराग के. संचेती म्हणाले की, रुग्णांसाठी अधिक चांगले परिणाम मिळविण्यासाठी विदाचलित तंत्रज्ञान, प्रतिक्रियात्मक वैद्यकीय सेवांचा वापर केला जात आहे. प्रतिबंधात्मक व सक्रिय आरोग्य सेवा प्रारूपाच्या दिशेने आमची वाटचाल सुरू आहे.